महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०
संपर्क क्रमांक (०२०) २४४७ ६९३८ E mail: evaluationdept@maa.ac.in

---

# Question Bank

Standard :- 12th

Subject :- युवकभारती

**सूचना**

१. फक्त विद्यार्थ्यांना प्रश्नप्रकारांचा सराव करून देण्यासाठीच

२. सदर प्रश्नसंचातील प्रश्न बोर्डाच्या प्रश्नपत्रिकेत येतीलच असे नाही याची नोंद घ्यावी.

# घटकनिहाय प्रश्नपेढी
# इयत्ता – बारावी
# विषय - मराठी (युवकभारती)

## विभाग - १ - गद्य

## पाठ - १ - वेगवशाता

- प्रा.शिवाजीराव भोसले

कृती:१खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (८)

१)खालील कृती करा. ०२

य)अधोगती म्हणजे :- [ ]

र)जीवन विभागलेले घटक :- [ ]

२)कारणे लिहा. ०२

य)माणसे वाहनांवर आरूढ होतात ,कारण- [ ]

र) जीवन हे दशदिशांना विभागलेले आहे, कारण- [ ]

**<u>उतारा (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ३व४)</u>**

वेग हे गतीचे एक रूप आहे. आपले जीवनही स्थिती आणि गती यांत विभागलेले आहे. थांबणे, चालणे, धावणे असे हे जीवनचक्र फिरतच असते. आपल्या विचारांनाही गती असते, जिला आपण प्रगती म्हणतो. ती विचारांची गती असते. गतीला जेव्हा दिशा असते तेव्हाच ती प्रगती या संज्ञेला पात्र ठरते. दिशाविहीन गती ही अधोगती ठरते. आजच्या जीवनात विलक्षण वेगवानता आढळते. रस्ते वाहनांनी व्यापलेले असतात. माणसे घरांत राहतात म्हणूनच अल्पकाळ तरी स्थिर राहतात. एरवी गतीपायी अगतिक होतात. अहोरात्र भरारणारी आणि थरारणारी वाहने पाहिली म्हणजे आश्चर्य वाटते. ही आली कोठून? आली कशी आणि कशासाठी? पूर्वी देशोदेशींचा इतिहास घडला. लोकांनी जगप्रवासही केला; पण आजच्या एवढी अवखळ वाहने कोठे दिसत नसत. आता माणूस घरातून दारात आला, की वाहनावर आरूढ होतो. वेळ थोडा असतो. कामे बरीच असतात. पायी चालत ती उरकता येत नाहीत. जीवन हे दशदिशांना विभागलेले आहे. मुलांची शाळा एका टोकाला, आपले कार्यालय दुसऱ्या टोकाला, मंडई एका बाजूला तर दवाखाना दूर, कुठल्या तरी दिशेला. जीवनाची ही टोके सांधणार कशी? जोडणार कशी? शेवटी गती ही घ्यावीच लागते. यथाप्रमाण गती ही गरज आहे; पण अप्रमाण, अवास्तव आणि अनावश्यक गती ही एक विकृती आहे.

३) 'अप्रमाण, अवास्तवआणिअनावश्यक गती ही एक विकृती आहे' हे विधान सोदाहरण स्पष्ट करा. (४)

किंवा

3) 'अहोरात्र भरारणारी व थरारणारी वाहने पाहिली म्हणजे आश्चर्य वाटते.' या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

उतारा : २ अ/आ : खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (८)

१) चौकटी पूर्ण करा. ०२

य) अति वेगामुळे बेभान होणारी :

र) घरोघरी व दरडोई वाहने उपलब्ध असलेला देश :

२) हे केव्हा घडेल ते लिहा (२)

य) जेव्हा वाचलेला वेळ घालवण्यासाठी माणसे वाहनांच्या आहारी जातात, तेंव्हा ...

अमेरिकेसारख्या विकसित देशात माणसे वेगाने जीवन जगतात. घरोघर आणि दरडोई वाहन उपलब्ध असते. रस्तेरुंद, सरळ, निर्विघ्न आणि एकमार्गी असतात. घरे, कार्यालये, बाजारपेठा यांत निदान शंभर मैलांचे किमान अंतर असते. जवळच्या जवळ सगळे असे सहसा नसते. अंतरावरच्या गोष्टींशी जवळीक साधण्यासाठी दूरवर जावे लागते. यातून माणसामाणसांत दुरावा निर्माण होतो. तो जाचदायक आणि असह्य होऊ नये म्हणून वेगाचा आश्रय घेतला जातो. वेगामुळे माणसे बेभान होतात. भान हरपले म्हणजे अस्वस्थता विरून जाते. वेगात एक बेहोषी असते. भारतीयांनी अमेरिकन जीवनशैली पत्करण्याचे कारण नाही. आपल्याकडे अंतरे कमी आहेत. माणसे खूप आहेत. कामे फारशी नाहीत.जीवनाची टोके सहज सांधता येतात. थोडी त्वरा करावी लागते; पण भरधाव वेगाने अंतर काटावे अशी स्थिती नसते. मुंबईसारखे विस्तीर्ण नगर गाड्यांनी सांधलेले असते. गाड्या रूळावरून चालतात. त्यात भरकटणे फारसे नसते. गाडीत चढले म्हणजे माणसांचे धावणे थांबते. खरी अडचण असते ती रस्त्यावरून येणाऱ्या- जाणाऱ्या दोन आणि चारचाकी वाहनांची. त्यांचा वेग मर्यादित ठेवला तर ती साधने म्हणून उपयोगी पडतात. वेळ आणि श्रम वाचवण्यासाठी त्यांचा उपयोग होतो; पण अनेकदा असे घडते, की वाचलेला वेळ घालवावा कसा हे कळेनासे होते आणि मग तो घालवण्यासाठी पुन्हा माणसे वाहनांच्या आहारी जातात. आरंभी माणसे वाहनांवर स्वार होतात. मग वाहने माणसांवर स्वार होतात.

- स्वमत /अभिव्यक्ति

३)॰आरंभी माणसे वाहनांवर स्वार होतात; मग वाहने माणसांवर स्वार होतात॰ हे विधान सोदाहरण स्पष्ट करा. किंवा

३) वाढत्या वाहतूक कोंडी ॰याविषयी तुमचे मत तुमच्या शब्दांत लिहा. (४)

उतारा : ३ कृती : अ/आ खाली दिलेल्या उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (८)

१) चौकटी पूर्ण करा.

वेग हिरावून घेतो ते : [ ] [ ]

२)कारणे लिहा. ०२

अपघात होण्याची दोन कारणे : य) ---------------र) ----------------------

वाहन हे वेळ वाचवण्यासाठी असते. ते वेळ घालवण्यासाठी नसते. त्याचा वेग बेताचा असणे अगत्याचे असते. माणसे चालू आणि पळूही शकतात; पण रस्त्याने कोणी चालण्याऐवजी पळू लागला तर त्याचे कौतुक करावे का? अपेक्षित स्थळी वेळेवर पोचता येईल, अशा बेताने वाहने चालवण्याऐवजी उगाचच भरधाव वेगाने चालवण्यात औचित्य ते कोणते? वाहनाचा वेग वाढला म्हणजे त्याच्यावरचा ताबा कमी होतो. पुढचे वाहन मागे टाकून पुढे जाण्याच्या हव्यासामुळे अनेक अपघात होतात. रात्रीच्या वेळी विलक्षण वेगाने धावणारी गाडी ही रातराणी म्हटली जाते. रात्री भरघाव वेगाने प्रवास करून पार पाडावीत एवढी महत्त्वाची कामे दरवेळी असतात का? वाहनाचा वेग अनिवार झाला, तर चित्ताची व्यग्रता वाढते. डोळ्यांवर, मनावर, शरीरावर ताण पडतो. शरीरभर अनावश्यक स्पंदने निर्माण होतात. हादरे बसून मज्जातंतू आणि मणके कमकुवत होतात. कमरेची आणि पाठीची दुखणी ही वाहनधारकांची व्यथा असते. बसणे, उठणे, चढणे, उतरणे, चालणे, वळणे, वर-खाली पाहाणे या मुक्त हालचालींचे संगीत विसरून स्वत:ला वाहनाशी जखडून ठेवणे आणि वाहनाचा वेग अंगीकारून आपल्या शरीरव्यापारात अडथळे निर्माण करणे हे धोरण निसर्गविरोधी आहे. आरोग्याची हानी करणारे आहे. जीवनातले ताणतणाव वाढवून पोचणार तरी कोठे? आपले स्वत्व आणि स्वस्थता हिरावून घेणारा अस्वाभाविक वेग कमी करणे, हे आपले

- **स्वमत अभिव्यक्ती** 0४

३) ' वाहन हे वेळ वाचवण्यासाठी असते. ते वेळ घालवण्यासाठी नसते' या विषयी तुमचे मत लिहा.

किंवा ३) सुरक्षित व सुखाचा प्रवास व्हावा ' या साठी वाहन चालावतांना कोणकोणती दक्षता घेतली पाहिजे' ते तुमच्या शब्दांत लिहा.

## गद्य :३. आयुष्य...आनंदाचा उत्सव
- शिवराज गोर्ले .

उतारा - १.अ /आ - पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.
(८)

१) कृती करा. ०२

लेखकाने सांगितलेल्या आनंदाच्या कोणत्याही दोन गमती.
→ ______
→ ______

२) खालील चौकटी पूर्ण करा.

आनंदा विषयी लोकांना पडणारे प्रश्न- १)...................... २)...................... ०२

उतारा (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.१०)

आनंद सगळ्यांनाच हवा असतो... पण आपला आनंद नेमका कशात आहे, हे अनेकांना कळत नसतं. आनंद म्हणजे नेमकं काय हेही उलगडलेलं नसतं. कुठे असतो हा आनंद? कुठे नसतो हा आनंद? आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे! ही फक्त कविकल्पनाच नव्हे, तेच सत्य आहे, किंबहुना शाश्वत सत्य आहे! आनंदाची गंमत अशी आहे, की तुम्ही शोधू लागलात, की तो दडून बसतो, पकडू गेलात, की हातातून निसटतो. आनंदासाठी जितका आटापिटा कराल, तितका तो हुलकावण्या देतो. जितका सहजपणे घ्याल, तितका आनंद सहज प्राप्त होतो. आनंद असतोच. तो अनुभवता मात्र यावा लागतो. आनंदाच्या बाबतीत कळसा काखेत असूनही आपण गावाला वळसा घालीत असतो. आनंद आपण बाहेर शोधत असतो आणि तो मात्र आत असतो. आनंद आपल्या मनातच असतो. आनंदाच्या झऱ्याचा उगम आपल्या अंतरंगातच असतो. हे खरं आहे, की आनंद सर्वत्र असतो; पण अंतरंगात आनंद असेल, तरच तो अनुभवता येतो. आनंदाचं नातं जुळतं, ते फक्त आनंदाशी. आनंदाला आकर्षित करतो, तो फक्त आनंदच. आनंदाला प्रसवतो, तोही आनंदच.

- **स्वमत अभिव्यक्ती** ०४

३) लेखकाने सांगितलेले आनंदाचे स्वरूप तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

किंवा

३) –आनंदाच्या झऱ्याचा उगम आपल्या अंतरंगातच असतो॰ या वाक्यातील आशय तुमच्या शब्दांत लिहा.

उतारा २. पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. (८)

१) खालील चौकटी पूर्ण करा. २

य) निरागस, आनंदी वृत्तीची असणारी. :- [ ]

र) कणाकणानं टिपायचा असतो तो. :- [ ]

२) हे केव्हा घडेल ते लिहा. २

य) छोट्या छोट्या आनंदाला आपण पारखे होतो;जेव्हा-.........

र) आपल्याला थक्क व्हायला होतं , जेव्हा-..........

उतारा (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.११ आणि १२)

सौंदर्य जसं पाहणाऱ्याच्या दृष्टीत असतं, तसा आनंद घेणाऱ्याच्या वृत्तीत असतो. लहान मुलं निरागस, आनंदी वृत्तीची असतात, म्हणूनच ती आनंद घेण्यात तरबेज असतात. आनंद हा त्यांचा आग्रह असतो, अधिकार असतो. त्यांनी -हात॰ केल्यावर चिमणी भुर्रकन उडाली तरी त्यांना केवढा आनंद होतो. किती आतून हसतात ती! आपण मोठे होतो आणि या छोट्या छोट्या आनंदाला पारखे होतो. आनंदाची हीच तर गंमत आहे. आनंद छोट्या छोट्या गोष्टींतच असतो. आपण मात्र तो मोठ्या गोष्टींत शोधत असतो. आयुष्यात अशा मोठ्या गोष्टी, आनंदाचे मोठे प्रसंग कितीसे येतात? तेव्हाच आनंद घ्यायचा आणि बाकी आयुष्य काय नुसतं रेटत राहायचं? आनंद कणाकणानं टिपायचा असतो. क्षणाक्षणानं घ्यायचा असतो. आपल्याला मात्र तो टनाटनानं हवा असतो. -खाईन तर तुपाशी, नाहीतरउपाशी.॰ तिथंच सगळं चुकतं. निसर्गात तर काय आनंद भरून राहिलेला आहे. -देता किती घेशील दो कराने॰, अशीच अवघी परिस्थिती आहे. हिवाळ्यातल्या कोवळ्या उन्हाचा आनंद, श्रावणातली रिमझिम अंगावर झेलण्यातला आनंद, चांदण्या रात्री भटकण्यातला आनंद.. झाडांचे नुसते आकार पाहात हिंडलं, तरी थक्क व्हायला होतं. हिरव्या रंगाच्या नुसत्या छटा पाहात राहिलं तरी भान हरपतं. बदलत्या प्रकाशात त्या बदलताना न्याहाळत बसलं, तर वेडं व्हायला होतं. साक्षात निसर्ग ज्यांना आनंद देऊ शकत नाही, त्यांनी आयुष्यातील आनंदाला विसर्ग द्यावा, हेच बरं.

- **स्वमत /अभिव्यक्ती** ०४

३)लेखकाने वर्णिलेला निसर्गातून मिळणारा आनंद तुमच्या शब्दांत लिहा.

किंवा

३) सौंदर्य जसं पाहणाऱ्याच्या दृष्टीत असतं,तसा आनंद घेणाऱ्याच्या वृत्तीत असतो
या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा

उतारा ३. पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. (८)

१) कृती करा. २

आनंदी आयुष्यासाठी लेखकाने सांगितलेली सोपी तत्त्वं.
- य) 
- र) 

२) खालील विधाने योग्य की अयोग्य ते लिहा. २

य) यश, वैभव ही आनंद अनुभवण्याची निमित्तं आहेत.:-

र) पैशाने आनंद विकत घेता येऊ शकतो. :-

<u>उतारा (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.१३आणि १४)</u>

यश, वैभव ही आनंदाची कारणं नव्हेत. आनंद अनुभवण्याची ती निमित्तं आहेत. पैशानं आनंद विकत घेता येत नाही. खरा आनंद विकाऊ नसतोच. टिकाऊ असला तरच तो खरा आनंद. एखाद्या ध्येयानं, स्वप्नानं झपाटून जाणं आणि त्याच्या पूर्ततेसाठी झटून प्रयत्न करणं हेच माणसाचं जगणं आहे; पण या प्रयत्नांतही आनंद असतोच. तो घेता आला, की आनंदासाठी वेगळा प्रयत्न करावा लागत नाही. आनंदी आयुष्यासाठीचं एक सोपं तत्त्व आहे- ज्यात तुम्हांला खरा आनंद होतो, तेच क्षेत्र निवडा. स्वत:च्या आवडीचं काम निवडा. केवळ आई-वडिलांची इच्छा म्हणून मुलानं डॉक्टर होऊन काय साधतं? त्याला वाटतं आपण आई-वडिलांच्या आनंदासाठी हे केलं; पण जेव्हा आई-वडिलांना जाणवतं, की मुलगा खरा आनंदी नाही, तेव्हा शेवटी तेही खंतावतातच. ज्यात तुम्हांला खरा आनंद वाटतो, तेच काम करा. अर्थात काही वेळा हे शक्य नसतं. हवं तेच काम मिळतं, असं नाही; पण अशा वेळी जे काम करायचंच आहे, त्यात आनंद घ्यायला शिकणं हेही शक्य असतंच. कुठल्याही कामात आनंद घ्यायच्या पुष्कळ युक्त्या असतात. तुमच्यासारखंच काम करणारे इतर कित्येक जण हसत, मजेत काम कसं करू शकतात, ते जाणलंत, तर तुम्हीही हसत, आनंदात काम करू शकाल, यश मिळवू शकाल.

- **स्वमत /अभिव्यक्ती** ०४

३) तुमचे जीवन आनंदी होण्यासाठी तुम्ही काय कराल, ते लिहा.

किंवा

३) ज्यात तुम्हांला खरा आनंद वाटतो, तेच काम करा.॰ या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

# ५. वीरांना सलामी –अनुराधा प्रभूदेसाई

**कृती : १अ/ आ) खालील उता-याच्या आधारे सूचनेनुसार कृती सोडवा.** ०८

१)लेखिकेच्या सात दिवसांच्या पर्यटनातील शेवटचे टप्पे : ०२

य] ____________ र] ____________

२) एका शब्दात उत्तर द्या. ०२

य] तोलो लिंगच्या पायथ्याशी बांधलेलेस्मारक:

र]भयाण पर्वतांवर चढणारे:

उतारा : पान नं. २०

एका पर्यटकाच्या नजरेतून सुरू केलेला सात दिवसांचा प्रवास-लेह, नुब्राव्हॅली, पँगाँग लेक आणि सरतेशेवटी द्रास, कारगिल! आता शेवटचा टप्पा शिल्लक होता. कारगिल आणि द्रास! सोबत असलेला लडाखी ड्रायव्हर स्टानझिन पाच वर्षांपूर्वी घडलेल्या कारगिल युद्धाच्या आठवणींना उजाळा देत होता. गाडी पुढे जात होती. आम्ही द्रासला पोहोचलो. शासकीय विश्रामगृहात दोन खोल्या मिळाल्या. विजय॰च्या स्मारकापर्यंत पोहोचलो. समोर दिसणारा तोलोलिंग, डावीकडे नजर गेली, की दिसणारा रौकीनॉब, हंप, इंडिया गेट, थ्री पिपल, टायगर हिलचा सुळका, त्याच्या बाजूचा पॉईंट ४८७५-भारतीय जवानांनी काबीज केलेल्या शिखरांची रांग. होय, याच मातीतून धूळ अंगावर घेत उंच १६००० फुटांवर बर्फाच्छादित शिखरांवर, शत्रूच्या तोफा पहाडावरून आग ओकत असताना ह्या भयाण पर्वतांवर आमचे धैर्यधर अथक चढत राहिले होते. मृत्यू समोर दिसत असतानाही त्याच्या जबड्यात हात घालून मृत्यूलाच आव्हान देणारी बावीसतेवीस वर्षांची तेजोमय स्फुल्लिंगं होती ती! ज्यांना आशीर्वाद द्यायचे, त्यांच्यासमोर नतमस्तक होऊन सलामी देणं किती कष्टप्रद आहे, ह्याची जाणीव झाली. थरथरत्या हातांनी, डबडबलेल्या डोळ्यांनी त्या स्मारकाला सलाम केला.

- **स्वमत § अभिव्यक्ती** ०४

३)कारगिल युद्धात भारतीय सैनिकांनी दाखवलेल्या पराक्रमा बद्दल तुमचे मत मांडा. **किंवा**३)भयाणपर्वतांवर अथक चढणारे आमचे धैर्यधर॰ या ओळीतून भारतीय जवानांचे तुम्हास जाणवणारे गुण विशद करा

नमुना कृती क्रमांक - २

कृती : २ अ/आ) खालील उता-याच्या आधारे सूचनेनुसार कृती सोडवा. ०८

१)लेखिकेने -मिशन लडाखसाठी॰ राखीपौर्णिमेचा मुहूर्त निवडण्याची दोन कारणे: ०२

य] ____________________

र ____________________

२)य]-मिशन लडाखला॰ निघण्यापूर्वी येथून प्रतिसाद मिळाला: ____________ ०१

र]कर्नलझायांनी लेखिकेला दिलेली शाबासकी: ____________ ०१

उतारा पान नं. २१

ऑगस्ट महिन्यात श्रावण असतो आणि श्रावण म्हणजे -राखी पौर्णिमा!॰ सगळ्यांचा आवडता सण. त्या राखीच्या एका धाग्यानं बहीण-भावाचं नातं कायमचं घट्ट राहातं. बहिणीच्या भावावरील निरपेक्ष प्रेमाची आणि भावावरील तिच्या रक्षणाच्या जबाबदारीची ही भावनिक वीण. मग आपल्या रक्षणकर्त्याला प्रत्यक्ष भेटून राखी बांधली, आशीर्वाद दिले; तर आपली कृतज्ञता व्यक्त होईल आणि राखीचा सन्मान होईल. आमचं एकमत झालं आणि रक्षाबंधनाचा मुहूर्त साधून लोकांना घेऊन कारगिलला जायचं हे निश्चित ठरवलं. चोवीसजण आमच्याबरोबर यायला तयार झाले आणि सुरू झालं -मिशन लडाख॰. सैनिकांच्या रेजिमेंटमध्येजायचं, सैनिकांना भेटायचं; म्हणजे जणू सिंहाच्या गुहेत प्रवेश मिळवायचा होता. बऱ्याच खटपटी करून आम्हांला निघण्यापूर्वी १४ कोअरच्या लेहमधील हेडक्वार्टरमधून प्रतिसाद आला. आम्हांला १४ कोअरच्या कर्नल झा यां आमचं मन धास्तावलं, सैन्यदलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी त्यांच्या केबिनमध्ये जाऊन बोलायचं होतं; पण मनातील कित्येक प्रश्नांची भेंडोळी कर्नल झा यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वापुढे बाद झाली. --तुम्ही लष्कराचं मनोबळ खूप वाढवत आहात.॰॰ अशी पाठीवर थाप मिळाली आणि निघताना दारापर्यंत सोडायला आल्यावर कर्नल झा हात हातात घेऊन म्हणाले, --विसरू नका-वन्स कनेक्टेड, ऑलवेज कनेक्टेड.॰॰ त्यांचा शब्द त्यांनी पुढील वर्षी आणि थेट दहा वर्षांनीही पाळला अरुणाचलमध्ये भारत-चीन सीमेवर भेटून!

- स्वमत / अभिव्यक्ती ०४

३)सैनिक हेच खरे नायक आहेत॰ या विधाना विषयी तुमचे मत व्यक्त करा. **किंवा**

३) कर्नल झा यांची स्वाभववैशिष्ट्ये पाठाच्या आधारे तुमच्या शब्दांत लिहा.

नमुना कृती क्रमांक - ३

कृती : ३ अ/आ) खालील उता-याच्या आधारे सूचनेनुसार कृती सोडवा. ०८

१)ब्रिगेडियर ठाकूर यांनी लेखिकेला केलेल्या विनंती वजा सूचना: ०२

य] ------------------

र] -------------------

२) य] मिशन लडाखच्या गेल्या पाच वर्षांत लेखिकेला झालेली जाणीव: ०१

र] १९९९ मधील कारगिल युद्धाच्या वेळीचे कर्नल : ०१

उतारा पान नं. २४

गेल्या पाच वर्षात एक मात्र निश्चित जाणवलं, की तिथे गेल्यावर आपला अहंकार, बडेजाव आणि प्रतिष्ठितपणाची चढलेली पुटं निखळून पडताहेत. लडाखच्या भिन्न भिन्न दऱ्याखोऱ्यात भन्नाट एकाकी, रौद्र आणि हिरवळीचा दुरान्वयानेही संबंध नसलेल्या कठीण भूप्रदेशात राहूनही ममत्व, बंधुभाव जपणाऱ्या, नाती जोडणाऱ्या आणि ती टिकवणाऱ्या सैनिकांना भेटलं, की -आपली माणसं॰ भेटल्याचा गहिवर दाटून येत आहे. आपले सैनिक हे हिरे आहेत. त्यांना आपण जपलं पाहिजे. त्यांच्याबद्दल कृतज्ञ राहिलं पाहिजे. आम्ही पाच वर्षं रक्षाबंधनासाठी लडाखला ग्रुप घेऊन येत आहोत, याचं प्रचंड अप्रूप वाटून ब्रिगेडियर कुशल ठाकूर या सोहळ्यासाठी आणि आम्हांला भेटायला आवर्जून आले होते. १९९९ मधील कारगिल युद्धाच्या वेळी कर्नल असलेले कुशल ठाकूर तोलोलिंग फत्ते करण्याच्या योजनेचे शिल्पकार होते. ते आमच्यासारख्या सामान्य माणसांना भेटायला येतात,याच्यापरता मोठा सन्मान तो कोणता? आमच्याशी संवाद साधत असताना ब्रिगेडियर ठाकूर आम्हांला म्हणाले,तुम्ही पाच वर्षांचा वादा केलात आणि तो निभावलात, ह्याबद्दल अभिनंदन; पण माझा प्रेमाचा, वयाचा अधिकार आणि हक्क वापरून सांगतो, तुम्ही हे मिशन बंद करू नका. इथे नेहमी या. आमच्या तरुण जवानांना भेटा त्यांचा हौसला बुलंद करा. तुमच्या शहरातील कुशाग्र बुद्धीच्या मुलांना सांगा, आम्हांला त्यांची गरज आहे.

- **स्वमत- अभिव्यक्ती** ०४

३)ब्रिगेडियर ठाकूर यांनी शहरातील कुशाग्र बुद्धीच्या मुलांना मार्गदर्शन करण्याची विनंती लेखिकेला करण्यामागे तुम्हाला जाणवणारी कारणे लिहा.

**किंवा**

३)लष्कर आणि नागरिकांमध्ये तुम्ही एक भावनिक सेतू बांधत आहात॰ या विधानातील आशय स्पष्ट करा

## गद्यपाठ § ८. रेशीमबंध
## - डॉ. यू.म.पठाण

कृती १ खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. गुण (०८)

१.प्रस्तुत उताऱ्यात लेखकाने उत्तररात्रीच्या आगमनाची सांगितलेली दोन वैशिष्ट्ये लिहा. ०२

य

र

२. उताऱ्याच्या आधारे खालील चौकटी पूर्ण करा. य.) लेखकाने वर्णन केलेली दोन फुले §

उतारा पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक ३५ व ३६

मध्यरात्र केव्हाच उलटून गेलेली असतेउत्तरर . ात्रीन ं हलकेच आकाशात पाऊल ठेवलेलं असतं इतकं . हळूवारपणे, इतकं अलगद, इतकं मुलायम, की कुणाला चाहूलदेखील लागू नये; पण ही चाहूल मला मात्र सहज लागतेमंद नाजूक स्पंदनं माझ्या तिच्या पावलांची मंद . मनात मात्र कुठं तरी उमटत राहताتजणू त्यामुळंच मग . माझा डोळा लागत नाहीपुरेशी झोप झाली आहे ., असं वाटत राहातं. मी हलकेच उठतोडायनिंग टेबलजवळ .चूळ भरतो . येतोत्याच्याजवळची खिडकी हलकेच . रात्रीच्या .उघडतो नीरव शांततेची निद्रा भंग होऊ नये म्हणूनबाहेर पाहातो तो . आसमंतात काळाकुळकुळीत अंधार दाटलेलाबागेतल्या . साऱ्या झाडांचा, साऱ्या वेलींचादेखील डोळा लागलेला. त्यांच्यावरची पाखरंदेखील गाढ झोपलेलीत्यांचा . चिवचिवाट अजून सुरू झालेला नसतो, कारण आता फक्त पहाटेचे तीनकुणास ठाऊक का .साडेतीन तर वाजलेले असतात-, ही वेळ मला फार आवडतेसारं . जग साखरझोपेत असतंविरलेल्या-काळज्या मिटल्या-साऱ्या चिंता . असतातमन कसं समेवर आलेलं . मला वाटतं .असतं, आपलं खरंखुरं मन हेच असतं, जे सुखदुखांच्या पलीकडेः कुठंतरी दूर दूर गेलेलं असतंआपलंच नव्हे तर या दुधाळ . सायलीचंदेखीलकेशरी .तांबडसर बोगनवेलीचंदेखील . गुलमोहोराचंदेखील.जांभुळसर जॅक्रांडाचंदेखील . किरमिजीपिवळसर इवलाल्या इंद्रधनुष्यी-निळसर-फुलांच्या घाणेरीचंदेखीलपांढऱ्याशुभ्र नि रक्तचंदनी . चाफ्याचं देखील.

३. स्वमत/अभिव्यक्ती - ०४

३)मन कसं समेवर आलेलं असतं, हे विधान तुमच्या शब्दांत स्पष्ट करा. किंवा

३)उत्तररात्रीच्या आगमनाचे वर्णन तुमच्या शब्दांत करा

कृती २)अ/आ  खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.                ०८

१). खिडकीतल्या कळोखात लेखक काय शोधत होते.                          ०२

य. [ ]

र. [ ]

२). उताऱ्याच्या आधारे खालील चौकटी पूर्ण करा .                          ०२

एकाच विश्वाचे दोन घटक → य [ ]
→ [ ]

## उतारा -पाठ्यपुस्तक पृष्ठक्रमांक ३६-

या साऱ्यांमध्ये नि माझ्यामध्ये असं कोणतं बरं नातं आहे? कोणते रेशीमबंध आहेत? कोणती जवळीक आहे? केव्हा पहाट होते नि केव्हा मी या साऱ्यांना भेटतो, अशी असोशी मनाला का बरं लागून राहते? हे रेशीमबंध कुठं तरी आदिमत्वाकडे तर मनाला ओढून नेत नाहीत? मानवाला निसर्गाची जी ओढ युगानुयुगांपासून लागून राहिली आहे, ती या आदिम, ऋजु, स्नेहबंधांमुळे तर नाही?... मी डायनिंग टेबलजवळ येतो, तेव्हा भान येतं, की आपण उघडलेल्या खिडकीतल्या काळोखात सायलीचा, मोगऱ्याचा नि चाफ्याचा सुगंध शोधत होतो . जॅक्रांडाची निळाईबोगनवेलीची लाली शोधत .जांभळाई शोधत होतो- होतो नि केशरी गुलमोहोराई शोधत होतो ! काळ्या अंधारात हे सारेच विसावले होते, सुखावले होतेआणि माझं वेडं मन . मात्र त्यांना केव्हा जाग येते, याची आस लावून बसलं होतं. असं मला या वृक्षवेलींच्या बाबतीतच वाटत नाही तर माझ्या लहानग्या नातीबद्दलही वाटतंतिचं नाव . -अल्विशा!॰ माझ्या मुलीची ती-अल्मासची-लहान मुलगीतिचं नाव जसं जगावेगळं आहे तशीच . तीही मुलखावेगळी आहेअल्मास आमच्याकडे राहायला आली .ल झाली असेलनसेलअजून वर्षभराचीदेखी ., की अल्विशाही तिच्याबरोबर येते; पण दिवसभर असते ती माझ्याच अंगाखांद्यावरही उत्तररात्रीची . नीरवता नि अल्विशाच्या गाढ झोपेतील निरागस शांतता यात किती कमालीचं, आश्चर्यकारक साम्य आहे, नाही? हे नातंदेखील आदिम नातंच नाही का? -निसर्गातलं नि मानवातलं? शेवटी ते दोघेही एकाच विश्वाचे दोन घटक आहेत, हा विचार हे नाजूक नातं पाकळीपाकळीनं उलगडू लागतो.

३. स्वमत/अभिव्यक्ती -                                                          ०४

३)रेशीमबंध॰,या शीर्षकाची समर्पकता तुमच्या शब्दांत लिहा . किंवा

३)निसर्ग आणि मानव यांच्यातील परस्परसंबंध तुमच्या शब्दांत सांगा.

कृती ३.अ/आ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. ०८

१ हे रेशीमबंध आजकालचे नसावेत तर ते कधीचे असावेत . ०२

य [ ] र [ ]

२ .ही गोंडस फूले आपल्याला काय देऊन जातात असे लेखकास वाटते . ०२

[ ] [ ]

उतारा (३७- पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक)

प्रकाश पसरू लागतो, तशी सकाळ होऊ लागते आणि मग दिसतं, की वाफे तर कोरडेच आहेत . बागेतल्या नळाला रबरी पाईप लावून मी वाफ्यांमध्ये पाणी घालू लागतोकुंड्यांमध्ये पाईप लावू . चाफ्यांच्या .लागतो, गुलमोहोराच्या, जॅक्रांडाच्या, सायलीच्या नि बोगनवेलीच्या गोल गोल आळ्यांना पाणी देऊ लागतोपाण्याच्या थेंबांचा . स्पर्श झाल्यावर पानं कशी तरारतात, हे अनोखं दृश्य खरोखरीच अनुभवण्याजोगं असतंआदल्या दिवशी . मोगऱ्याला पाणी घालायचं चुकून राहून गेलं तर तो कसा रुसून बसतो, कोमेजू लागतो नि पाण्याचा शिडकावा झाला, की दुसऱ्या दिवशी पहाटेच गोंडस कळ्यांच्या रूपानं आपल्याकडे पाहून खुदूखुदू हसू लागतोअबोला सोडून तो ! सुगंधाची पखरण करू लागतो नि मग जाणवू लागतं, की इवली इवली झाडं नि वेलीदेखील किती भावुक असतात! कधीमधी थोडीफार रुसलीफुगली तरी आपण त्यांची थोडीशी वास्तपुस्त केली, मायेनं त्यांच्यावरून हात फिरवला, त्यांचा तहानलेला जीव शांत केला, की ती देखील ही गोंडस फुलं देऊन आपल्याला केवढा विरंगुळा, केवढा तजेला देऊन जातात! -आणि मग तुकोबांच्या त्या अभंगाचा खराखुरा अर्थ उकलू लागतोवृक्ष आणि वल्ली यांना आपली त्यांनी . सोयरीधायरी का बरं म्हटलं असावं, यातलं इंगित उमलू लागतंत्यांच्यातलं नि आपल्यातलं हे नातं ., हे रेशीमबंध आजकालचे नसावेत तर ते आदिम असावेत, युगायुगांचे असावेत, याची जाणीव उत्कटतेनं होऊ लागते. ...असं नसतं तर आपल्याला त्यांची नि त्यांना आपली एवढी अनिवार ओढ का बरं लागली असती?

३ स्वमत/अभिव्यक्ती - ०४

३)संत तुकारामांनी वृक्ष आणि वल्ली यांना आपली सोयरीधायरी का बरं म्हटले असावं, हे तुमच्य शब्दांत स्पष्ट करा. किंवा

३) इवली इवली झाडं नि वेली देखिल किती भावुक असतात,या विधानासंबंधी तुमचे मत लिहा.

## १०.दंतकथा
ले.वसंत सबनीस

उतारा : १ : पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. [८]

१] खालील कृती पूर्ण करा. ०२

य) -कल्पित कथा॰ या अर्थी आलेला शब्द - ______________________

र) प्रेयसीच्या दातांना कुंदकळयांपर्यंत नेऊन पोहोचवणारे - ___________________

२]कारणे लिहा. ०२

य) लेखकाच्या मते मराठी भाषेत अशी म्हण किंवा शब्दप्रयोग नाही ज्यात दातांबद्दल मंगल भावना व्यक्त झाली आहे,कारण -

र) लेखकाला प्रेयसीच्या दातांत जीव अडकून तिच्या प्राप्तीसाठी झगडणाऱ्या प्रियकराचे उदाहरण ऐकिवात नाही.कारण -

उतारा (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.४३ व ४४)

मला स्वत:ला तर दातांबद्दल मुळीच प्रेम वाटत नाही. कारण लहानपणी मला दात येत असताना त्यांनी घरातल्या माणसांना रडवले होते म्हणे! अर्थात हे सर्वस्वी खरे असेलच असे नाही. त्यांच्याबरोबर मीही रडलो असलो पाहिजे. दात आल्यानंतरही मी दिसेल त्याला चावत असे अशीही एक दंतकथा ऐकून अजूनही कित्येक नातेवाईक माझ्यापासून दूर पळतात. आता मी दिसेल त्याला मुळीच चावत नाही. कारण चावण्याची हौस अनेकदा स्वत:चीच मनगटे चावून चावून भागली आहे! पण माझ्या दातांनी मला एवढा उपद्रव दिला आहे, की त्या मानाने दुसऱ्यांना झालेला उपद्रव काहीच नाही आणि म्हणूनच दातांबद्दल मला दातांत धरता येईल एवढासुद्धा आदर राहिलेला नाही. माझ्याप्रमाणे मराठी भाषेलाही दातांबद्दल आदर नाही असेही मला नंतर आढळून आले. कारण मराठी भाषेत अशी म्हण किंवा शब्दप्रयोग नाही ज्यात दातांबद्दल मंगल भावना व्यक्त झाली आहे. ज्या म्हणी व शब्दप्रयोग दातांशी निगडित आहेत, त्या दारिद्र्य, भिकारपणा, असभ्यपणा यांचे प्रत्यंतर घडवणाऱ्या आहेत. नाही म्हणायला प्रेमविव्हल कवींनी प्रेयसीच्या दातांना कुंदकळ्यांपर्यंत नेऊन पोचवले असेल तेवढाच अपवाद! तरी पण केवळ प्रेयसीच्या दातांत जीव अडकून तिच्या प्राप्तीसाठी झगडणाऱ्या प्रियकराचे उदाहरण माझ्या तरी ऐकिवात नाही. डोळे, रंग, ओठ, एखादा तीळ, एखादी खळी माणसाला गुंतवतात; पण दात पाहून वेडा झालेला प्रियकर मला अजून भेटावयाचा आहे.

**स्वमत - अभिव्यक्ती कृती -** ०४

३] लेखकाची दातांबद्दलची कल्पना तुमच्या शब्दांत लिहा. किंवा

३] दाताचे दुखणे खूपच त्रासदायक असते,तुमच्या शब्दांत लिहा.

उतारा:२: अ/आ पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. [८]

१] लेखकाच्या मते माणसाला न चुकवता येणाऱ्या दोन गोष्टी- ०२

य) ____________

र) ____________

२]खालील चौकटी पूर्ण करा. ०२

य) परशा स्वतःला म्हणवून घ्यायचा :- [ ]

र) माणसाला चुकवता येणार नाही अशा दोन गोष्टी [ ] [ ]

उतारा ( पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ४४ )

आपल्या ताकदीची-मस्तीची परशाला फार घमेंड होती. स्वत:चा उल्लेख करताना तो -शिंव्ह◦ म्हणायचा. स्वत:ला -शिंव्ह◦ म्हणून घेण्यात त्याला अभिमान वाटायचा. --काय परशा, यंदा कशी काय तयारी आहे?◦◦ असे कुणी विचारले, की त्याचे उत्तर ठरलेले असे- --शिंव्हाला काय भ्या हाय व्हय कुनाचं?◦◦ -शिंव्ह मातीत उतरला, की लांडगी, कोल्ही पाक पशार व्हत्यात... -शिंव्हाला अल्याड लई झोप लागतीया◦, अशा भाषेत तो नेहमी स्वत:बद्दल बा◌ेलायचा. त्याला दात घासायचा विलक्षण कंटाळा असे. चार-आठ दिवसांतून एकदा केव्हातरी दात घासण्याचे सोंग करायचा. त्याबद्दल मी एकदा सहज त्याला विचारले, --परशा, तू दात घाशीत नाहीस वाटतं रोज?◦◦ --शिंव्ह काय दात घासतो व्हय कदी?◦◦ असे त्याने ताडकन उत्तर दिले. असा हा सिंहासारखा उग्र व बलदंड परशा एके दिवशी सपाटून मार खाल्लेल्या कुत्र्यासारखा समोरून येत होता. त्याची ऐट, त्याचा दिमाख, त्याची घमेंड यांपैकी कशाचाही मागमूस त्याच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता. कुस्तीत हरला तरी तो कधी असा दिसला नव्हता. जवळ जाऊन मी विचारले, --काय पहेलवान, काय झालं आज?◦◦ केविलवाणा चेहरा करून म्हणाला, --दात रं! काल रातच्या धरनं असा ठणकतुया! काईएक सुचेनासं झालंया.◦◦ मला त्यावेळी परशाचे हसू आले; पण काही काळानंतर माझाही जेव्हा परशा झाला तेव्हा माझा नक्षा पार उतरला. माणसाला मरण आणि दातदुखी चूकवताच येत नसावी.

- **स्वमत /अभिव्यक्ती**

३] परशाचे स्वभाववर्णन तुमच्या शब्दांत लिहा. ०४

किंवा

३]जन्मात एकदाही दात न दुखलेला मनुष्य आढळत नाही - या विधानाबाबत तुमचे मत सकारण लिहा.

उतारा क्र.३. पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. [८]

१] एका शब्दात उत्तर लिहा

रात्रीच्या वेळी गडबड करणारे दोघे § ०२

य) ____________

र) ____________

२] खालील चौकटी पूर्ण करा. ०२

य) दाताच्या मुळाशी खोल बसून घाव घालणारा :-

र) एका वाक्यात उत्तर द्या.दाताला मूळ असते हे केंव्हा कळते ....................

<u>उतारा (पाठ्यपुस्तक पृष्ठक्र.४४ व ४५)</u>

अनेक वर्षे समोर येईल ते मिटल्या डोळ्यांनी चावणारा माझा दात एके दिवशी काही कारण नसताना ठणकू लागला. असा ठणकू लागला, की त्याने माझी अवस्था हीनदीन झाली. दात ठणकू लागल्याबरोबर मी पहिली गोष्ट कोणती केली असेल तर ही, की ज्यांच्या ज्यांच्या दाढदुखीची अवहेलना केली होती, त्या सर्व माणसांची त्यांच्या दात व दाढांसकट मनातल्या मनात क्षमा मागितली. दात दुखायला लागला, की तो मुळापासून दुख.. लागतो. किंबहुना दाताला मूळ असते हे फक्त तो दुखायला लागला म्हणजेच कळते. माझा दात जेव्हा दुखायला लागला तेव्हा तर माझी खात्रीच झाली, की आपण आरोग्यशास्त्राच्या पुस्तकात पाहिलेले दाताचे चित्र आणि प्रत्यक्ष आपले दात यांत फार फरक असला पाहिजे. आपल्या दाताला मूळ नसून झाडासारख्या मुळ्या असल्या पाहिजेत आणि त्या हिरड्यांत सर्वत्र पसरल्या असल्या पाहिजेत. मला का व्हावा? प्रत्येक दाताला हात लावून पाहिल्यानंतर ज्या दाताने शंख करायला लावला, तो दुखरा दात याची खात्री झाली. दुखऱ्या दाताला लहानसा स्पर्शसुद्धा खपत नाही! बरे, हे दुखणे तरी साधे, सरळ असावे? तेही नाही. एखाद्या कवीच्या मनातील जिप्सीसारखा एखादा लाकूडतोड्या माझ्या दाताच्या मुळाशी खोल बसलेला असतो आणि तो एकामागून एक घाव घालीत असतो.

**स्वमत - अभिव्यक्ती कृती -** ०४

३] दातदुखी बाबतची तुमची मते लिहा. किंवा

३] लेखकाला दुखणारा दात राक्षसासारखा अक्राळविक्राळ वाटतो,याबाबत तुमचे मत लिहा.

उतारा ४ : . पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. [८]

१] लेखकाशी फितुरी करणारे - ०२

य)

र)

२] खालील चौकटी पूर्ण करा. ०२

य) तोंडातल्या तोंडात दाताला आरसा कशाला?यातून डोकावणारी म्हण :-

र) खोटे,नश्वर या अर्थाने आलेला शब्द :-

उतारा ( पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.४५

दात दुखण्याने मी आध्यात्मिक तत्त्वचिंतनही करतो. दात दुखतो तेव्हा मला साक्षात्कार होतो, की दात हेच सत्य आहे. जग मिथ्या आहे. त्या क्षणी संसार असार वाटतो. नेहमी हवेहवेसे वाटणारे शेंगदाणे दगडासारखे बेचव लागतात. बायको व मुले हा केवळ भास आहे असे वाटते. समोरून येणारी एखादी सुंदरी डोळ्यांना जाणवतच नाही आणि दाताचा ठणका मला ब्रह्मांड दाखवू लागतो. रात्रभर माझ्या ब्रह्मांडाच्या दहा-वीस फेऱ्या तरी सहज होतात आणि पहाटे ब्रह्मांड मिथ्या असून दातच सत्य आहे याची पुन्हा एकदा जाणीव होते. माझ्याबद्दल लोकापवाद फार. दातदुखीही त्यातून सुटलेली नाही. माझ्या दातदुखीच्या काळात सबंध आळीला रात्रभर झोप मिळत नाही असे म्हणतात; पण माझा यावर विश्वास नाही. अर्थात आळीतील सर्व लोक आळीपाळीने माझ्या घरात डोकावून -फक्त दातदुखीच ना?॰ असा सवाल करून जातात हे खरे आहे; पण यावरून त्यांना झोप येत नाही असा निष्कर्ष काढणे बरोबर मागच्याच दातदुखीच्या वेळी मी पलंगाच्या कोपऱ्यात दोन्ही हातात तोंड धरून बसलो होतो. (दातदुखीच्या काळात सामान्यत: मी असाच बसतो.) चेहऱ्यावर बहुधा कुणीतरी नुकतीच थोबाडीत मारल्याचा भाव असावा. कारण मी आरशात पाहत नाही. तोंडातल्या तोंडात दाताला आरसा कशाला? मी घशातल्या घशात आवाज बंद करण्याचा प्रयत्न करूनसुद्धा तो बंद होत नव्हता. घसा आणि जीभ फितुर झाली होती.

स्वमत - अभिव्यक्ती कृती - ०४

३] दात दुखतो तेंव्हा लेखकाला होणारा साक्षात्कार तुमच्या शब्दांत लिहा. किंवा

३] दातदुखीसारखा गंभीर विषयही लेखकाने विनोदी अंगाने रेखाटला आहे § तुमच्या शब्दांत लिहा

उतारा : ५ : अ /आ खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. [८]

१] लेखकाच्या दातदुखीची वैशिष्ट्ये § ०२

य) ________________________________

र) ________________________________

२] खालील चौकटी पूर्ण करा. ०२

य) लेखकाच्या घरी होणाऱ्या परिसंवादाचा विषय :-

र)लेखकाच्या घरी होणाऱ्या परिसंवादाचा अध्यक्ष :-

उतारा ( पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.४५ व ४६ )

दातदुखीच्या काळात माझी सहनशक्ती पार खलास झालेली असते. दाते किंवा दातार ह्या दातांशी जवळीक दाखवणाऱ्या माणसांनाही भेटू नये असे वाटते! माझ्या दातदुखीचे आणखी एक वैशिष्ट्य असे, की माझ्या विव्हळण्याने शेजारीपाजारी गोळा होतात आणि माझ्या दाताच्या अध्यक्षतेखाली दातदुखी, ती का होते, टाळावी कशी आणि झाल्यावर कोणते उपचार करावेत यावर एकदा तरी परिसंवाद होतोच. उपस्थित वक्ते मोठ्या हिरिरीने त्यात भाग घेतात. हीच मंडळी एवढ्या मोठ्याने बोलतात, की माझे विव्हळणे त्यात बुडून जाते. माझा अनुभव असा, की दातदुखीवरील चर्चेने दातदुखी मुळीच कमी होत नाही! दातदुखीवरील खूप उपचार मला पाठ झाले आहेत. माझा दात दुखू लागला, की मी बायकोला त्यातले काही उपचार करायला सांगतो आणि तीही आपले काही उपचार करते. अशी मिळून २०-२५ प्रकारची औषधे, बोळे माझ्या दातामागे लागतात. चार दिवसांनी दात दुखायचा थांबतो. कशामुळे थांबला याचा शोध करायच्या मी भानगडीत पडत नाही. दात दुखणे थांबल्याचे कळल्याबरोबर परिसंवादातील सगळे वक्ते आपलाच उपचार लागू पडला की नाही याची खात्री करून घेण्यासाठी येतात. मी कुणाचेही मन दुखवत नाही. प्रत्येकाला त्याने सुचवलेल्या उपायानेच गुण आल्याची कबुली मोकळा होतो. सगळे खूष होतात. दंतआघाडीवर सर्वत्र सामसूम होते. एखाददुसरा महिना जातो आणि पुन्हा तोच दात, तोच ठणका आणि तेच उपचार यांचा पुन्हा प्रयोग होतो.

- स्वमत - अभिव्यक्ती कृती - ०४

३] दातदुखीवरती लेखकाच्या घरी होणारे उपचार § तुमच्या शब्दांत मांडा.

किंवा

३] दातांची काळजी कशी घ्यावी - तुमच्या शब्दांत लिहा.

# इ) अपठित गद्य

उतारा:१: इ. खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. [०४]

१]य) स्मिताच आयुष्य बदलून जाण्यामागील कारण ०१

___________________________

र) स्मिताच्या आईला डॉक्टरांनी दिलेला सल्ला ०१

_____________________________

वयाच्या दहाव्या वर्षी दोन्ही डोळ्यांना अंधत्व आल्यामुळे स्मिताच आयुष्य पार बदलून गेलेनिमित्.त होते डोळ्यांत औषध टाकल्याचंरम्य परिसरातील घरात खेडेगावातील निसर्ग. गाणे मस्ती याला पूर्णविराम -नाच.अंगणात बागडणारी स्मिता अंधाराच्या खाईत लोटली गेली डॉक्टरांच्या या सांगण्यावर .अंधाच्या शाळेत घालवण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.मिळाला स्मिताच्या आईने कंबर कसलीआणि घरादाराशी काही देणंबाच्या घेणं नसलेल्या व्यसनी बा-इथे .विरोधाला न जुमानता स्मिताला घेऊन ती दादरच्या कमलाबाई अंध विद्यालयात दाखल झाली ◦ .तिने स्वतःला सावरलं.सर्वच मुली आपल्यासारख्याच असलेल्या पाहून तिला बरं वाटलंआई , मी इथे आनंद.आता तू माझी काळजी करू नकोस ाने राहीन -.शिकेन.या शब्दात तिनेच आईला धीर दिलाशिकवण्याचा प्रकार -नव्या शाळेत शिकण्या .गावात पाचवीपर्यंत शिक्षण झालं होतं . कार्यक्रमात तिने स्वतःला ,सर्व स्पर्धा,शाळेतला अभ्यास.लेखनासाठी ब्रेल लिपी होती.वेगळा होता आठवीपासून सर्वसाधारण मुलींच्या छ.झोकून दिलंबिलदास शाळेतही ती मागे राहिली नाही-रिडर्स.वक्तृत्व स्पर्धा जिंकून तिने आपलं वेगळेपण दाखवून दिलं,निबंध,ट्यना,नृत्य. तिने एका वर्षाचा टीचर्स ट्रेनिंग .रायटर्सच्या मदतीनेअभ्यास करून ती शालांत परीक्षा पास झाली बरोबरीन.फॉर द ब्लाइंडच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला े टेलिफोन ऑपरेटरचे प्रशिक्षणही घेतलं.

ग्रेट दिव्यांग उषा धर्माधिकारी

२] खालील चौकटी पूर्ण करा. ०२

य) स्मिताने एक वर्षाचा प्रवेश घेतलेला अभ्यासक्रम

र) लाखो अंध व्यक्तींसाठी वरदान ठरलेली लिपी

उतारा: २:इ . दिलेल्या अपठित उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. (०४)

१)खालील कृती करा. (०२)

य)न बोलताही संवाद होणारा काळ मागे पडून आलेला नवा काळ :-

र)हे तत्त्वज्ञान आरपार बिंबवलं गेलं आहे :-

न बोलताही संवाद होणारा संवेदनशील काळ मागं पडून आता खूप बोलूनही काळीज न ओलावणारा काळ आला आहे. कारणं अनेक आहेत; पण मला जाणवणारं मुख्य कारण म्हणजे- -माणूस मिथ्या सोनं सत्य॰ हे तत्त्वज्ञान आ पैसा मिळवला की माणूस सुखी होतो॰, हा निष्कर्ष गरिबीतून येऊ शकतो; पण गरिबी दूर करताना दुसरेच एक आंतरिक दारिद्र्य निर्माण होऊ नये, याची दक्षता मार्केटिंग॰च्या भरात घेतली गेली नाही.यांतून संवादसुसंवाद,प्रेम,माया, वात्सल्य कायमिळणार? रपार बिंबवलं गेलं आहे. -भावनेवर का जगता येणार? असे प्रश्नविचारणारा एक वर्ग जगात निर्माण झाला. या वर्गाच्याहातात प्रसारमाध्यमं होती, उद्योगधंदे होते. सूत्रधाराने बाहुल्यांना खेळवावं त्याप्रमाणे ह्या मंडळींनी गेल्यापंचवीस वर्षांत साऱ्या जगाचं एका भव्य -मॉल॰मध्ये रूपांतर केलं, जिथे पैसा बोलतो, मन मात्र मुकं राहतं. एकदा पैशानेच जगता येतं-पैशासाठीच जगायचं असतं, हाच जगण्याचाउद्देशझाला, की मग शिक्षण पैशासाठीच होतं. सजणं, धजणं, प्रेम, कलानिर्मिती, श्रद्धा, भक्ती, मदिरं यांचीही दुकानं होतात, मग दुकानातली भाषा खरेदी-विक्रीचीच असते. तिथे -संवाद॰ नसतो. असतो तो खरेदी-विक्रीचा व्यवहार.

२)पैसा हाच जगण्याचा उद्देश असल्यास होणारे परिणाम: (०२)

उतारा क्र.३- इ.दिलेल्या सुचनेनुसार कृती करा. ०

१)बागेतील फुलाची वैशिष्ट्ये ०२

१)............... २).................

३)................... ४)...............

बागेतील झाडावर उमललेले एखादे टपोरे फूल असते. त्याचा सौम्यसा सुगंध आल्हाददायक असतो. त्याच्या नाजूक पाकळ्या आणि सुरेख रंग डोळ्यांना सुखावतात. हा छोटासा अनुभव घेतानाही आपले मन प्रसन्न होऊन जाते. इवल्याशा फांदीवर वाऱ्याच्या लहरींनी डुलणारे ते फूल त्याच दिवशी संध्याकाळी कोमेजून जाते हे खरे; पण त्यामुळे त्याचेदिवसभरातील अस्तित्त्व आणि जाणाऱ्या-येणाऱ्याला त्याने दिलेला आनंद या गोष्टी खोट्या ठरत नाहीत. आपणही आपले हे छोटेसे जीवन त्या फुलासारखे सुंदर करू शकतो. या नाशवंत जीवनाला त्याच्या अस्तित्त्वकालापुरता का होईना; पण काही अर्थ प्राप्त करून देऊ शकतो. तसे करण्यातच या जीवनाचे काही सार्थक आहे. या जीवनाचा प्रवास करीत असताना आपल्या निकट राहून सोबत करणारी, आसपास वावरत धीर पुरवणारी, आपल्यापेक्षा चार पावले पुढे चालत राहून प्रेरणा देणारी अशी निरनिराळ्या कोटींतील माणसे आपल्याला भेटतात. त्यांच्यापैकी काहींच्या सहवासामध्ये निरामय आनंदाचे क्षण लाभतात. आणखी कोणाच्या विचारांमधून अंत:करणाला काही दिलासा मिळतो आणि असामान्य विभूतींनी दाखवून दिलेल्या मार्गाच्या अल्पशा अनुसरणातून आपले जीवन उन्नत होते. या साऱ्या व्यक्तींविषयी कृतज्ञतेचा भाव ठेवणे हे जीवनातील एक कर्तव्य ठरते. त्याचे स्मरण जागवणे हा त्यांच्या ऋणांतून काही प्रमाणात उतराई होण्याचा एक मार्ग आहे.

२)जीवनाचा प्रवास करीत असताना भेटणारी कोणत्याही दोन कोटींतील माणसे. ०२

य)

र)

**उतारा क्र.४ : इ.** उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा ०४

१) खालील बदल केंव्हा घडतील - ०२

**य)** तुम्ही तुमच्या भावी पिढीला कसे वाचवाल

| |
|---|
| |

**र)** जे आज तुम्हाला अवगत आहे ते तुम्ही -

| |
|---|
| |

मी अशक्त मी कमी शिकलेला,अज्ञानी मी ,,माझ्या हातात काय आहेमी कशाला या ? म्हणून हतधैर्य होऊ नका जे आज तुम्हाला ? भानगडीत पडू अवगत आहे ते तुम्ही शेजाऱ्यापाजाऱ्याला सांगाजे सत्य तुम्हाला दिसत आहे.,ते तुम्ही आपल्या भावी पिढीला दाखवा क रुढींमुळे तुम्ही या थराला पोहचला आहातपूर्वज्यांच्या ज्या वेडगळ धार्मिक व सामाजि., यातून तुम्ही तरी निसटून जा ,आणि तेही न साधल्यास निदान आपल्या भावी पिढीस तरी या अज्ञान बंधनापासून,कोत्या विचारा पासून वाचवा ,व्यावहारातील अनिष्ट जातीबंधानाच्या वरवंट्याखाली सापडू देऊ नका म्ही कानाडोळा केलातआणि इतके समजावूनही जर तु.,तर आपल्या भावी पिढीच्या उन्न्तीचा खून तुम्ही केला,असे ते नि संशय समजून तुम्हाला दोष देत:राहतील म्हणून . आज तुमच्यावर पडलेल्या जबाबदारीची योग्य वासलात लावून,मिळालेल्या संधीचा योग्य फायदा स्वताघेऊन :,आपल्या मागून येणाऱ्यासही त्याचा संग्रह करून ठेवाआपणास अनुकरण करण्यास . पूर्वजांचे कीर्तीरूप भांडवल आपणाकडे नाही म्हाणून मनस्वी आणि कार्यार्थी पुरूष हताश होऊन स्वस्थ बसत नाही तर आलेल्या परिस्थितीशी सारखे झगडत राहूनत्यातूनच आपला मार्ग कडून . येणाऱ्यास अनुकरणीय असे म्हाणून आपण आपल्या मागून .स्वतःचा आणि आपला उद्धार करतो, . आपले शील बनवा

- डॉबाबासाहेब आंबेडकर .

२) खालील कृती करा. ०२

य) मनस्वी आणि कार्यार्थी पुरूष हताश होऊन स्वस्थ न बसता ते ...

र) इतके समजावूनही जर तुम्ही कानाडोळा केला तर .......

**उतारा क्र.५ :** उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा ०४

१. य) सत्यशोधक समाजाचे संस्थापक: ______________ १

र) सत्यशोधक समाजात प्रवेश करताना करावी लागणारी कृती : ________________ १

महात्मा जोतिराव फुले यांनी १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजात सभासद होताना तळी उचलून पुढीलप्रमाणे प्रतिज्ञा करावी लागे."सर्वमनुष्य एकाच ईश्वराची लेकरे आहेत. त्यांचे व माझे बंधुत्वाचे नाते आहे, हे जाणून वागण्याचा मी नित्य प्रयत्न करीन.देवाची भक्ती,उपासना वगैरे करताना तसेच धर्म विधीकरताना मी कोणाही मध्यस्थाची जरूर ठेवणार नाही व असे वागण्याविषयी मी इतरांचे मन वळविण्यासाठी झटेन.मी स्वतः शिकून मुलामुलींस विद्या शिकविल्या शिवाय राहणार नाही. राज्यकर्त्यांशी एकनिष्ठेने वागेन अशी सर्व साक्षी सत्यस्वरूप परमात्म्याला स्मरून मी प्रतिज्ञा करतो. हा माझा पवित्र उद्देश सिद्धीस नेऊन जन्माचे सार्थक करण्यास परमेश्वर मला सामर्थ्य देवो." ही प्रतिज्ञाइ. स. १८९१मध्ये -बालीवाला थिएटर, पुणे॰येथे भरलेल्या सत्यशोधकसमाजाच्या सभेत मंजूर केली

२. य)विधान पूर्ण करा.

य)मी स्वतः शिकून ________________

र) प्रतिज्ञा मंजूर करण्यात आली ती सभा : _______________ १

## विभाग - २ - पद्य विभाग

### पद्य पाठ २- कविता -रोज मातीत - कल्पना दुधाळ

कृती १ अ)खालील कवितेच्या आधारे सुचनेनुसार कृती करा . (गुण ८)
आकलन ०४

१)कवितेतील स्त्री करीत असलेली विविध कामे....................

**२)चौकटी पूर्ण करा .**

१)कांदे लावण्याची जागा -

२)हिरवं गोंदलेली जमीन -

**३)चौकटी पूर्ण करा**

१)कांड्या-कांड्यानी साधलेला -

२)पाणी शेंदण्याच्या स्त्रोत§

**४)चौकटी पूर्ण करा.**

१)घरादाराला बांधलेले §

२)शेतकरी स्त्री नांदण्याचे ठिकाण §

**५)कवितेत आलेले यमकाच्या जोड्या शोधून लिहा .**

१)

२)

३)

४)

६).संदर्भानुसार योग्य जोड्या लावा.

| अ गट | ब गट |
|---|---|
| १)रोज मातीत मी गं नांदते | अ)काडी काडी जोडून मी माझा प्रपंच साधत आहे. |
| २)कांड्या-कांड्यानी साधलेला आहे. | आ) मरणाच्या वेदना सहन करून मी रोज राबते |
| | इ) मी या काळ्याभोर मातीत रोजची नांदत आहे. |

७)एका शब्दांत उत्तर लिहा.

१)शुभपताकाची माळ- ☐

२)रोपे लावण्यासाठी खणलेले लांब चर ☐

३)कवितेत उल्लेखलेले एक प्रकारचे फुल ☐ -

४)शेतकऱ्याची काळीभोर शेतजमीन § ☐

- अभिव्यक्ती ०४

१)शेतकरी महिलांच्या कष्टमय जीवनाचे वर्णन कवितेच्या आधारे लिहा .

२)तुम्ही पाहिलेल्या कष्टकरी शेतकरी स्त्रीचे वर्णन तुमच्या शब्दात लिहा.

३)कुटुंबाच्या उदरनिर्वाहाकरिता कष्टकरी शेतकरी स्त्रीचे योगदान स्पष्ट करा.

४)शेतकरी स्त्रियांच्या मनातील स्वतःच्या संसाराविषयीचा भाव स्पष्ट करा .

५ )कष्टकरी शेतकरी स्त्रीलादैनंदिन जीवनात करावी लागणारी कष्टमय कामे तुमच्या शब्दांत लिहा .

६)रोज मातीत राबराब राबणाऱ्या शेतकरी महिलेचे मनोगत तुमच्या शब्दांत लिहा .

## रोज मातीत

सरीवाफ्यात-, कांदं लावते
बाई लावते नाही कांदं ग, जीव लावते
बाई लावते
काळ्या आईला, हिरवं गोंदते
बाई गांेदते रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

फुलं सोन्याची, झेंडू तोडते
बाई तोडते
नाही फुलं ग, देह तोडते
बाई तोडते
घरादाराला, तोरण
बांधते बाई बांधते रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

ऊस लावते, बेणं दाबते
बाई दाबते
नाही बेणं ग, मन दाबते
बाई दाबते
कांड्याकांड्यांनी-, संसार सांधते
बाई सांधते
रोज मातीत, मी ग नांदते

उन्हातान्हात, रोज मरते
बाई मरते
हिरवी होऊन, मागं उरते
बाई उरते
खोल विहिरीचं, पाणी शेंदते
बाई शेंदते
रोज मातीत, मी ग नांदते बाई नांदते

आ)खालील ओळींचा अर्थ लिहा ०४

१)ऊस लावते ,
बेणे दाबते
बाई दाबते
नाही बेणं गं,
मन दाबते .

२)खालील ओळींचा अर्थ लिहा
फुलं सोन्याची ,
झेंडू तोडते
बाई तोडते
नाही फुलं गं,
देह तोडते
बाई तोडते

इ )काव्यसौंदर्य . /रसग्रहण ०४

१)खालील काव्यपंक्तीचे भावसौंदर्य लिहा
सरी वाफ्यात ,
कांदं लावते .
बाई लावते
नाही कांदं गं,
जीव लावते
बाई लावते
काळ्या आईला ,
हिरवं गोंदते.
बाई गोंदते
रोज मातीत ,
मी गं नांदते.
बाई नांदते.

२)खालील काव्यपंक्तीचेविचारसौंदर्य लिहा.
कांड्या-कांड्यानी,संसार सांधते ;
बाईसांधते,

रोज मातीत .मी गं नांदते.
बाई  नांदते.
**३)खालील काव्यपंक्तीचेविचारसौंदर्य लिहा.**
खोल विहीरचं,पाणी शेंदते
बाई शेंदते,
रोज मातीत .मी गं नांदते.
बाई  नांदते.
**४)खालील ओळीतील भावसौंदर्य स्पष्ट करा .**
१)घरादाराला तोरण बांधते ;
बाई बांधते ;
रोज मातीत .मी गं नांदते.
बाई  नांदते
२) उन्हातान्हात ,रोज मरते
बाई मरते
हिरवी होऊन,मागं उरते बाई  उरते.
**५)खालील ओळींचे रसग्रहण करा .**
१)उन्हातान्हात ,रोज मरते
बाई मरते
हिरवी होऊन,मागं उरते
बाई  उरते.
खोल विहीरचं,पाणी शेंदते
बाई शेंदते,
रोज मातीत .मी गं नांदते.
बाई  नांदते.
२)खालील ओळींचे रसग्रहण करा .
फुलं सोन्याची ,झेंडू तोडते
बाई तोडते
नाही फुलं गं,देह तोडते
बाई तोडते
घरादाराला तोरण बांधते ;
बाई बांधते ;
रोज मातीत .मी गं नांदते.
बाई  नांदते.

| |
|---|
| पद्य .६ रंग माझा वेगळा<br>• सुरेश भट |

**कृती १.अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा .** ०४

१)खालील कृती लिहा
य )अश्रुंची सोबत कवीला यासारखी वाटते. [ ]

र)इतरांना सुखावणाऱ्या परंतु कवीला झळा देणाऱ्या- [ ]

२) कवी सोबत पुढील गोष्टींनी केलेल्या कृती लिहा .
य)आयुष्य - ........................................
र)दु:ख -...............................................
३) **अभिव्यक्ती** ०४
१)दु:खाच्या प्रसंगातून बाहेर पडण्यासाठी तुम्हांला माहित असलेले उपाय लिहा .

२)तुमच्या मधील इतरांपेक्षा वेगळे असेणारे गुण तुमच्या शब्दात लिहा .

रंगुनी रंगांत साऱ्या रंग माझा वेगळा!
गुंतुनी गुंत्यांत साऱ्या पाय माझा मोकळा!
कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे;
मी असा की लागती ह्या सावल्यांच्याही झळा!
राहती माझ्यासवें हीं आसवें गीतांपरी;
हें कशाचें दुख ज्याला लागला: माझा लळा!
कोणत्या काळीं कळेना मी जगाया लागलों
अन् कुठे आयुष्य गेलें कापुनी माझा गळा!
सांगती -तात्पर्य॰ माझें सारख्या खोट्या दिशा :
चालणारा पांगळा अन् पाहणारा आंधळा!॰॰
माणसांच्या मध्यरात्रीं हिंडणारा सूर्य मी :
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा!

आ )खालील ओळींचा अर्थ स्पष्ट करा.

१)“राहती माझ्यासवें ही आसवें गीतांपरी ,
हे कशाचें दु:ख ज्याला लागला लळा!”

२)“ सांगती “तात्पर्य”माझे सारख्या खोट्या दिशा :
“ चालणारा पांगळा अन् पाहणारा आंधळा !”

इ)काव्यसौंदर्य.

१)“रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा !
गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा !

या ओळींमधील विचारसौंदर्य स्पष्ट करा .

२)“ कोणत्या काळीं कळेना मी जगाया लागलों
अन् कुठे आयुष्य गेलें कापुनी माझा गळा !”

या ओळींमधील भावसौंदर्य स्पष्ट करा .

इ)रसग्रहण

“माणसाच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य मी
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा !”

## पद्य - क्र.७ विंचू चावला

- संत एकनाथ

अ.खालील कवितेच्या आधारे सुचनेनुसार कृती करा. ०४

१) कामक्रोध विंचू चावण्याचा परिणाम ........

२) कामक्रोध विंचू चावल्यामुळे व्याकुळ झालेला........

३) अति दारूण असणारी.........

४) मनुष्यरुपी इंगळीच्या दंभाचा परिणाम

५) कामक्रोधरुपी विंचवाचा उतारा.....

विंचू चावला वृश्चिक चावला ।
कामक्रोध विंचू चावला ।
तम घाम अंगासी आला ।।धृ.।।
पंचप्राण व्याकुळ झाला ।
त्याने माझा प्राण चालिला ।
सर्वांगाचा दाह झाला ।।१।।
मनुष्य इंगळी अति दारुण ।
मज नांगा मारिला तिनें ।
सर्वांगी वेदना जाण ।
त्या इंगळीची ।।२।
ह्या विंचवाला उतारा ।
तमोगुण मागें सारा ।
सत्त्वगुण लावा अंगारा ।
विंचू इंगळी उतरे झरझरां ।।३।।
सत्त्व उतारा देऊन ।
अवघा सारिला तमोगुण ।
किंचित् राहिली फुणफुण।
शांत केली जनार्दनें ।।४।।

- संत एकनाथ

३)अभिव्यक्ती ०४

१)कामक्रोधरुपी विंचवाची बाधा झाली की माणूस बेताल वागू लागतो याबद्दल तुमचे विचार लिहा.

२)सद्विचारांचे महत्त्व तुमच्या शब्दात लिहा.

**आ)- खालील ओळींचा अर्थ लिहा.०४**

१)मनुष्य इंगळी अति दारूण ।मज नागा मारिला तिने ।।
सर्वांगी वेदना जाण। त्या इंगळीची।।
सत्व उतारा देऊन । अवघा सारिला तमोगुण ।
किंचित राहिली फुणफुण। शांत केली जनार्दने ।।

**इ)काव्यसौंदर्य / रसग्रहण लिहा** ०४

२)विंचू चावला वृश्चिक चावला

कामक्रोध विंचू चावला
तम घाम अंगासी आला. या ओळोतील भावसौंदर्य स्पष्ट करा.
या विंचवाचा उतारा तमोगुण मागे सारा सत्त्वगुण लावा अंगारा
विंचू इंगळी उतरे झरझरा.

१)या विंचवाचा उतारा तमोगुण मागे सारा सत्त्वगुण लावा अंगारा
विंचू इंगळी उतरे झरझरा.

२)सत्त्व उतारा देऊन अवघा सारिला तमोगुण
किंचित राहिली फुणफुण
शांत केली जनार्दने.

# पद्य पाठ: ९: समुद्र कोंडून पडलाय

- कवी वसंत आबाजी डहाके

कृती १ अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. ०४

१) खालील कृती लिहा.

य) अस्वस्थ होणारा -

र) समुद्र येथे कोंडून पडला आहे -

ल) गगनचुंबी इमारती मधील मुलाचे बालपण असे आहे -

व) समुद्राला यांची काळजी वाटते -

२) क ) संध्याकाळच्या वेळी समुद्राची झालेली अवस्था

ख) समुद्राला दिसलेले शहराचे चित्र

अभिव्यक्ती - ०४

१) बालपण हरवून बसलेल्या आजच्या पिढीचे मनोगत तुमच्या शब्दात व्यक्त करा.

२) चंगळवादी संस्कृतीत अडकलेल्या शहरी समाजाचे चित्रण तुमच्या शब्दात व्यक्त करा .

३) निसर्ग आणि मानव यांचे अतूट नाते प्रस्तुत कवितेच्या आधारे स्पष्ट करा .

## पद्य पाठ क्र. ९- समुद्र कोंडून पडलाय

समुद्र कोंडून पडलाय गगनचुंबी इमारतींच्या गजांआड.

तो संत्रस्त वाटतो संध्याकाळीं : पिंजारलेली दाढी, झिंज्या
. हताशपणे पाहत असतो समोरच्या बत्तिसाव्या मजल्यावरील मुलाकडे,
ज्याचं बालपण उंचच उंच पण अरुंद झालंय
आणि त्याची त्याला कल्पनाच नाही.
समुद्राच्या डोळ्यांत थकव्याचं आभाळ उतरत येतं.
आणि शिणून तो वळवतो डोळे.
इमारतींच्या पलीकडच्या रस्त्यावर थकलेल्या माणसांचे पाय, बसचीं चाकं
समुद्र अस्वस्थ होऊन जातो
शहराच्या आयुष्याच्या विचाराने.
तेव्हा तो मनांतल्या मनांतच मुक्त होऊन फिरूं लागतो
शहरांतल्या रस्त्यांवरून, वस्त्यांमधून.
उशिरापर्यंत रात्रीं तो बसलेला असतो
स्टेशनवरल्या बाकावर एकाकी, समोरच्या रुळांवरील रहदारी पाहत,
हातांवर डोकं ठेवून अर्धमिटल्या डोळ्यांनी
त्याला आठवतं त्याच्याच शेजारीं
पाय मुडपून कसंबसं झोपलेलं एखादं मूल,
ज्याचं बालपण स्टेशनवरल्या बाकाएवढं,
आणि त्याची त्याला कल्पना असावी किंवा नसावी.
समुद्र खिन्न हसतो आणि शिणलेल्या पापण्या मिटून घेतो.
त्याला काळजी वाटते साऱ्यांच्याच बालपणाची
वयस्कांच्या शहरांतील.

- कवी वसंत आबाजी डहाके

आ) काव्यपंक्तीचा अर्थ लिहा.

स्टेशनवरल्या बाकावर एकाकी, समोरच्या रुळांवरील रहदारी पाहात,

हातांवर डोकं ठेवून अर्ध मिटल्या डोळ्यांनी.

इ ) काव्यसौंदर्य / रसग्रहण - ०४

१) हताशपणे पाहत असतो समोरच्या ३२ व्या मजल्यावरील मुलाकडे, ज्यांच बालपण उंचच उंच पण अरुंद झालंय आणि त्याची त्याला कल्पनाच नाही.
२) समुद्र खिन्न हसतो आणि शिणलेल्या पापण्या मिटून घेतो.

त्याला काळजी वाटते साऱ्यांच्याच बालपणाची वयस्कांच्या शहरातील.

३)समुद्र अस्वस्थ होऊन जातो

शहराच्या आयुष्याच्या विचाराने

तेव्हा तो मनातल्या मनातच मुक्त होऊन फिरू लागतो

शहरातल्या रस्त्यांवरून, वस्त्यांमधून

उशिरापर्यंत रात्री तो बसलेला असतो

## पद्य ११ . आरशातील स्त्री

- हिरा बनसोडे

कृती.१.अ)खालील कवितेच्या आधारे सुचनेनुसार कृती करा . ०४

- आकलन.

१)कोण ते लिहा.

य .पाऊस तरंग झेलणारी §

र -अंतबाह्य बदललेली §

ल.सर्व बहार लावणारी §

व .आभाळ झुल्यावर झुलणारी §

श–अंगणात दाराजवळ थांबलेले–

ब– बागेत वाट पाहणारी §

२)पुढील अर्थाचा शब्दसमूह लिहा.

य–दु:खामुळे होणारा ह्रदयाचा आक्रोश. .............................

र – बुद्धीने स्थिर असणारी ............................

३)अभिव्यक्ती

१) कुटुंबातील स्त्रियांच्या भुमिकेबद्दल तुमचे विचार लिहा .

२)संसार करत असताना ही प्रत्येक स्त्रीने स्वतःचे अस्तित्व टिकवले पाहिजे या विषयी तुमचे मत लिहा.

## आरशातील स्त्री

सहज आरशात पाहिले नि डोळे भरून आले
आरशातील स्त्रीने मला विचारले, -तूच ना ग ती!
माझेच रूप ल्यालेली, तरीही मी नसलेली
किती बदललीस ग तू अंतर्बाह्य!...
तुला सांगू तुझ्या अंतरीचे सुंदर पूर्वरंग
ऐक हं!... तू कशी होतीस ते!
पावसाचे तरंग ओंजळीत भरणारी चैतन्यमयी बालिका
अंगणात दिवे लावावेत तसे सर्वच बहर लावणारी तू नवयौवना
स्वप्नांचे पंख लावून आभाळ झुल्यावर झुलणारी तू ध्येयगंधा
नि आज नखशिखांत तू!तू आहेस फक्त स्थितप्रज्ञा राणी ...
आरशात भेटलीस तरी बोलत नाहीस ग मन उलगडून
ओठ मात्र असतात पिळवटलेले, खसकन देह तोडलेल्या फुलांसारखे,
इतकी कशी वेढून गेलीस या घनगर्द संसारात
जळतेस मात्र अहोरात्र पारंपरिकतेचे वरदान समजून
अंगणात थांबलेल्या तुझ्या प्रेयस चांदण्याला
दार उघडून आत घेण्याचेही भान नाही ग तुला
बागेतली ती अल्लड जाईही पेंगुळतेय तुझी वाट पाहून पाहून
पण तू, तू मात्र झालीस अस्तित्वहीन प्राण हरवलेली पुतळी
अनेकदा तुला मी अशी पाहते की काळीजच हंबरते
रात्रीच्या एकांतात तर हुंदका कंठात दाबून
शिवत असतेस तुझे ठिकठिकाणी फाटलेले हृदय
नि पदराखाली झाकतेस देहामधल्या असह्य कळा॰
तिचे हे बोलणे ऐकताच मी स्वतच हिंदकळतेय:
आणि अशातच, ती मला गोंजारीत, जवळ घेत
अधिकारवाणीने म्हणाली-
-रडू नकोस खुळे, उठआणि डोळ्यातले हे आसू !
सोडून दे शेजारच्या तळ्यात
नि घेऊन ये हातात
नुकतीच उमललेली शुभ्र कमळाची प्रसन्न फुले॰ (फिनिक्स(

**आ)काव्यपंक्तीचा अर्थ स्पष्ट करा.** ०४

१)"अंगणात थांबलेला तुझ्या प्रेयस चांदण्याला
दार उघडून आत घेण्याचेही भान नाही ग तुला
बागेतील ती अल्लड जाई ही पेंगुळतेय तुझी वाट पाहून पाहून
पण तू तू मात्र झालीस अस्तित्वहीन प्राण हरवलेली पुतळी "

२) सहज आरशात पहिले नि डोळे भरून आले .
आरशातील स्त्रीने मला विचारले "तूच ना ग ती !
माझेच रूप ल्यालेली ,तरीही मी नसलेली
किती बदललीस ग तू अंतबाह्य ....!

- **इ) काव्यसौंदर्य./ रसग्रहण** ०४

"पावसाचे तरंग ओंजळीत भरणारी चैतन्यमई बालिका
अंगणात दिवे लावावेत तसे सर्वच बहार लावणारी तू नवयौवना"
स्वप्नांचे पंख लावून आभाळ झुल्यावर झुलवणारी तू ध्येयगंधा
नि आज नखशिखांत तू...तू आहेस फक्त स्थितप्रज्ञा राणी !

या ओळींमधील काव्यसौंदर्य स्पष्ट करा .

अनेकदा तुला मी अशी पाहते की काळीजच हंबरते
रात्रीच्या एकांतात तर हुंदका कंठात दाबून
शिवत असतेस ठीकठिकाणी फाटलेले ह्रदय"

या ओळींतील भावसौंदर्य स्पष्ट करा .

"आरशात भेटलीस तरी बोलत नाहीस ग मन उलगडून
ओठं मात्र असतात पिळवटलेले ,खसकन देह तोडलेल्या फुलांसारखे
इतकी कशी वेढून गेलीस या घनगर्द संसारात
जळतेस मात्र अहोरात्र पारंपारिकतेचे वरदान समजून "

या ओळींचे रसग्रहण करा .

# विभाग -३- साहित्यप्रकार- कथा

(१) कथा साहित्य प्रकारपरिचय ०४

(२) कृती करा


(अ) कथा या शब्दाचा शब्दश: अर्थ



(आ) यासाठी कथा लिहिल्या जाऊ शकतात.



(इ) कथा म्हणजे .....



(३) उत्तरे लिहा.


(अ) कथेचा जन्म कसा झाला ? स्पष्ट करा.

(आ) कोणत्या मूळ धातूपासून कथा हा शब्द रूढ झला ते लिहा.

(इ) कथेची पूर्वपीठिका थोडक्यात स्पष्ट करा.

(ई) कथेच्या सादरीकरणाचे दोन पैलू स्पष्ट करा.


(उ) कोणत्या विशेषांमुळे कथा आजही लोकप्रिय आहे ते लिहा.



(४) कथेला समर्पक शेवटही असतो याबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

(५) “कथेचे -सादरीकरण॰ ही एक कला आहे आणि योग्य प्रयत्नाने ही कला साध्य होऊ शकते.” या विधानाबद्दल तुमचे मत स्पष्ट करा.

(६) कथाकथन आणि कथा अभिवाचन यासाठी व्यावसायिक संधीचे क्षेत्रे ....



- कथांवर आधारित कृती -०६

# १. शोध

- व. पु. काळे

- कृती§

(१) कृती करा.

(अ) अनुचं जेवण आटोपलं होतं ... तरीही

(आ) मुक्ताकडे नजर रोखीत अनु म्हणाली...

(इ) -आबासाहेब, अनु दिसत नाही कुठं ?॰

(ई) अनु एका महाराजचं विधान नेहमी ऐकवते.

(उ) अनु कोणती नोकरी करणार ?

(२) थोडक्यात उत्तरे लिहा.

(अ) अनुने पाठवलेल्या पत्रातील ओळी लिहा.

(आ) अनुने मुंबईत कोणत्या हॉस्पिटलमध्येनोकरी मिळवली ?


(इ) -डॉक्टर पेक्षा नर्स महत्त्वाची॰ अनुच्या या विधानाचा परामर्श घ्या.

(ई) एकाएकी अनुचा नूर बदलला याचे कारण लिहा.

(२) अनु या व्यक्तिरेखेच्या विकासातील टप्पे

(३) कृती करा.

(१)डॉक्टर आणि नर्सचा पेशा यातील वेगळेपण




(४)तुमच्या शब्दात लिहा.

(अ)आबाचेव्यक्तिमत्त्व.

(आ) अनुचा स्वभाव विशेष.

(इ)टॅक्सी ड्रायव्हरचे प्रसंगावधान.

(५)स्वमत.

(अ)–शोध॰ या कथेची समर्पकता तुमच्या शब्दांत रेखाटा.

(आ)आजच्या परिस्थितीत एका रुपयाचे महत्त्व तुमच्या शब्दांत लिहा.

(इ)कथेतील एक रुपयाच्या नोटेचे महत्त्व आपणांस कसे वाटते ते लिहा.

(ई) अनु आणि अनु भोवतालचे प्रसंग याचा शोध या कथेच्या आधारे स्पष्ट करा.

(उ) शोध या कथेतील रहस्याचा उलघडा कसा होतो ? ते तुमच्या शब्दांत लिहा.

(५)अभिव्यक्ती

(अ) -माझी वस्तू मला कधीच परत मिळणार नाही. एकानोटेसाठी तुमची ही अवस्था झाली... माझी प्रत्यक्ष मुलगी जेव्हा कायमची सोडून गेली, तेव्हा मी काय केलं असेन ?◦ या विधानाबाबत तुमचे विचार लिहा.

(आ)दैनंदिन जीवनात -टॅक्सी ड्रायव्हर◦ यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन स्पष्ट करा.

# २.गढी

- डॉ. प्रतिमा इंगोले

---

- कृती§

(१) **अ) चौकटी पूर्ण करा.**

१) गावाकडून वाहत जाणारी नदी -

२) बापू गुरुजींना कार्यक्रमाचे होतं -

३) बापू गुरुजींच्या लहानपणी गावात नव्हती -

४) बिन बापाचं लेकरू -

५) गावामध्ये शानानं उभी राहणारी -

**आ) सहसंबंध स्पष्ट करा.**


१) गावाभोवतालची झालर -

२)काळीभोर जमीन -

३)डोक्याएवढं वाढलेलं -

४)पांढरी पांढरी -

(२)कृती करा.



(३) खालीलपैकी वैदर्भी भाषेतीलशब्दसमूहांचा अर्थ लिहा.

(अ) (१) कवतीक पाहे –


(२) साजरं गाव –

(३) आवतन व्हतं –


(४) नासुकल्या हळ्याई पिंडाले झोम्बते –

(आ) कृती करा.

(१) वैदर्भीबोलीतील वाक्प्रचार



(२) कथेतील विविध म्हणी



(४) थोडक्यात उत्तरे लिहा.

(अ) सातपुड्याच्या दुपट्यावर वसलेल्या लहानश्या गावाचे वर्णन करा.

(आ)गुरुजींना आठवणाऱ्या एक दोन गोष्टी लिहा.

(इ) शाळेसाठी गुरुजींनी कोणते प्रयत्न केले ते स्पष्ट करा.

(ई) बोर्डिंगमधील मुलांचे वर्णन स्पष्ट करा.

(उ) गावात पावसाळ्यात होणारे बदल स्पष्ट करा.

(५) स्वमत

(अ)गावात शाळा उघडणाऱ्या बापूगुरुजींचे स्वभावचित्र तुमच्या शब्दांत लिहा.

(आ)संपत्या गेल्यानंतर बापूगुरुजींची अवस्था तुमच्या शब्दांत रेखाटा.

(इ)-गढी◦ याकथेतील गढीची बदलती रूपे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(ई) बोर्डिंगमधील मुलांचेगुरुजींबद्दलचे प्रेम तुमच्या शब्दांत लिहा.

(६)अभिव्यक्ती

(अ)बापूगुरुजींची भानावस्था -गढी◦ या कथेत कशी रेखाटली आहे, ते शोधून एकेका उदाहरणाद्वारे स्पष्ट करा.

(आ)वऱ्हाडी अर्थात वैदर्भी बोली भाषा तुम्हाला कशी वाटली, तुमच्या शब्दांत तिचे वेगळेपण स्पष्ट करा.

(इ) -गढी◦ याकथेची सार्थकता आणि सामर्थ्य स्पष्ट करा.

(ई) -अरे, मानसानं पयले पानी पावावं अन् मंग पोवावं” या वाक्यातील समर्पकता स्पष्ट पटवून द्या.

# विभाग- ४- उपयोजित मराठी

## ❖ मुलाखत लेखन

**कृती ४ अ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती  सोडावा.** (४)

१) मुलाखतीचे हेतु थोडक्यात विशद करा.
२) मुलाखतीची पूर्वतयारी कशी करावी याविषयी माहिती तुमच्या शब्दात स्पष्ट करा/ लिहा.
३) मुलाखत म्हणजे पूर्व नियोजित संवाद असतो हे तुमच्या शब्दात स्पष्टकरा.
४) मुलाखतीचा प्रारंभ हा श्रोत्यांच्या व वाचकांच्या काळजाचा ठाव घेणारा असावा याविषयी थोडक्यात आपले मत विशद करा.
५) मुलाखत घेताना घ्यावयाची दक्षता विषयी लिहा.
६) मुलाखत घेताना नक्की काय करावे याविषयी चे मुद्दे विशद करा.

**आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा** (१०)

१) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे मुलाखतीच्या स्वरूपाविषयी ची माहिती सुमारे १० ते१२ ओळीत स्पष्ट करा.

मुलाखत म्हणजे संवाद§ पूर्वनियोजन§ हेतुपूर्वक- तिघांचा सहभाग- स्वरूप विविधांगी- एकावेळी एका व्यक्तीची मुलाखत- अनेक व्यक्तींची मुलाखत- मुलाखतीचे स्वरूप लिखित,मौखिक, ध्वनिमुद्रित व प्रकट§ विचारप्रवर्तक§ भावनाप्रधान§ कुतूहल- सर्व बाजू स्पष्ट- अनुभव कथन§वाड.मयीन सौंदर्य- पिढ्यांनी मार्गदर्शन- वेगवेगळ्या स्वरूपाच्या मुलाखती- ज्यांच्याजवळ सांगण्यासारखे काही- ज्यांच्याकडून ऐकण्यासारखे- समाजातील अनेक व्यक्ती-उदा. कर्तृत्वसंपन्न व्यक्ती, असाधारण व्यक्ती, जगावेगळे आव्हाने पेलून असामान्य कर्तृत्व गाजवणारी व्यक्ती - उदाहरणासहित स्पष्टीकरण.

२) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे मुलाखतीची पूर्वतयारी याविषयी लिहा.

मुलाखत- मुलाखतीचा पाया- आवश्यक ती माहिती- विषयासंबंधी सखोल वाचन§ उद्दिष्ट§ विषय§ वेळ- प्रश्न संख्या- योग्य क्रम- मुलाखतीचे स्वरूप- मुलाखतीचे माध्यम- मुलाखतीसाठी व्यवस्था.

३) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे मुलाखतिची सुरुवात याविषयीची माहिती १० ते१२ ओळीत लिहा.

मुलाखतीचा प्रारंभ§ श्रोते, वाचक मनाने गुंतणे - आनंद - नैसर्गिक, सहजपणे,ओघाओघात- कृत्रिमतेचा स्पर्श§ मुलाखतदात्याचास्वभाव, शैली§चूटका§किस्सा§ शब्दफेक- वातावरण § मुलाखतीचीनांदी§ मुलाखतकाराचाआत्मविश्वास § श्रोते/वाचक गुंतणे.

४) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे नोकरीसाठी ची मुलाखत विषयी माहिती सुमारे १०ते१२ ओळीतलिहा.

नोकरीसाठीच्या मुलाखतीचे बदलते स्वरूप- मुलाखतीमध्ये जोखणे- व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन- वर्तनाशी संबंधित प्रश्न - जीवन विषयक दृष्टीकोन- उमेदवाराकडून अपेक्षा- मुलाखतीत अधिक प्राधान्य- मुलाखतीचे वैशिष्ट्य.

५) खालील मुद्द्यांच्या आधारे मुलाखत घेताना घ्यावयाची खबरदारी/ दक्षता/ काळजी या विषयी माहिती १० ते१२ ओळीत लिहा/विशद करा.

प्रश्नांची रचना§ वातावरण- प्रश्नाविषयीची पूर्वतयारी- मुलाखतकारची भूमिका- वेळेचे बंधन.

## ❖ माहिती पत्रक

४.खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.

१) माहितीपत्रकाचे स्वरूप स्पष्ट करा.

२)माहितीपत्रक म्हणजे काय ते सोदाहरण लिहा.

३)माहितीपत्रकामुळे माहिती देणारा व घेणारा यांच्यात एक नाते निर्माण होते, या विधानाची सार्थकता स्पष्ट करा.

४)आजच्या काळात व्यवसाय वृद्धीसाठी उत्कृष्ठ माहितीपत्रकाची आवश्यकता आहे,या विधानाची सार्थकता पटवून दया .

५) माहितीपत्रकाची गरज असणाऱ्या क्षेत्रांची नावे सांगा .

६) माहितीपत्रक वाचून झाल्यावर लोकांनी ते जपून ठेवणे म्हणजे उत्तम माहितीपत्रक या विधानाबद्दल तुमचे मत लिहा .

७) माहितीपत्रकामुळे आपले उत्पादन लोकांपार्यंत सहज पोहचविता येते .सोदाहरण स्पष्ट करा.

८) नवनव्या योजना ,नवीन उत्पादने हे ग्राहकांपार्येंत पोहोचाविण्यासाठी माहितीपत्रकाचा वापर वाढत आहे .या बाबत तुमचे मत लिहा.

९) माहितीपात्रकाच्या रचनेमध्ये कोणकोणत्या गोष्टी असाव्यात या बद्दल सविस्तर माहिती लिहा .

१०) उत्कृष्ट माहितीपत्रक तयार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींची माहिती सोदाहरण लिहा .

११) आकर्षक मांडणी व प्रभावी भाषाशैली ही माहितीपत्रकाची प्रमुख वैशिष्टे आहेत ते साकारण लिहा.

१२) माहितीपत्रक तयार करण्याकरिता कल्पनाशक्तीची आवश्यकता आहे . सोदाहरण लिहा .

१३) आपल्या उत्पादनाची विश्वासाहर्ता वाढविण्यासाठी उत्कृष्ठ माहितीपत्रकाची आवश्यकता आहे . या विधानाबद्दल तुमचे मत लिहा .

## अहवाल लेखन

अ)

१)अहवाल हे एक उपयुक्त दस्तऐवज आहे.हे विधान स्पष्ट करा.

२)अहवाल हा कोणत्याही कार्यक्रमाचा आरसा असतो ,या विधानाची सार्थकता स्पष्ट करा.
३)विश्वसनियता हे अहवालाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे.सोदाहरण स्पष्ट करा.शब्दमर्यादा हा आदर्श अहवालाचा विशेष आहे हे सविस्तर विशद करा

आ)

१) खालील मुद्द्यांच्या आधारे अहवाल लेखन करताना लक्षात घ्यावयाच्या बाबी तुमच्या शब्दात लिहा

अहवालची भाषा........ अहवाल लेखकाचे भाषेवरील प्रभुत्व ...... सारांशरूप ......विविधता......विश्वसनीयता .

२)अहवाल लेखनाची वैशिष्ट्ये मुद्द्यांना अनुसरून स्पष्ट करा.

१)वस्तुनिष्ठता आणि सुस्पष्टता

२) शब्दमर्यादा

३) नि:पक्षपातीपणा

३)खालील मुद्द्यांच्या आधारे अहवालाचे स्वरूप तुमच्या शब्दात लिहा.

कार्यक्रमाचा हेतू.....तारीख...वेळ...सहभागी व्यक्ती...विचारमांडणी .......प्रतिसाद .

४)खालील मुद्द्यांच्या नाधारे अहवालची आवश्यकता तुमच्या शब्दात लिहा,

भविष्यकालीन नियोजन........ महत्त्वकांक्षी उपक्रम.....परंपरा.....बारीकसारीक गोष्टींची नोंद ........विविध संस्थाना होणाऱ्या घडामोडींना अधिकृतता प्राप्त ......विश्वसनीयता.

५) खालील मुद्द्यांच्या आधारे अहवालाची अंगे तुमच्या शब्दात लिहा.

प्रास्ताविक.....विस्तार..... समारोप.........अहवालाची भाषा.

६)आदर्श अहवाल लेखनाच्या बाबी सविस्तर तुमच्या शब्दात लिहा.

७) वास्तवदर्शी लेखन हा अहवालाचा आत्मा आहे हे विधान स्पष्ट करा.

# विभाग-५- व्याकरण व लेखन

## ❖ व्याकरण.

वाक्यप्रकार कृती

५: अ.सूचनेनुसार कृती करा.

१.किती अफाट पाऊस पडला काल !

- वरील वाक्याचे योग्य विधानार्थी वाक्य ओळखून लिहा.

१. काल काय कमी पाऊस पडला का ?

२. काल कमी पाऊस पडला.

३. काल खूप पाऊस पडला.

४. काल खूप पडला नाही.

२.ही इमारत खूपच उंच आहे.

- वरील वाक्याचे योग्य उद्गारार्थी वाक्य ओळखून लिहा.

१. ही इमारत काही कमी उंच नाही

२.ही इमारत किती उंच.

३. किती लहान आहे ही इमारत !

४. बापरे !केवढी उंच आहे ही इमारत

३.आजच्या जीवनात विलक्षण वेगवानता आढळते.

- **वरील वाक्याचे उद्‌गारार्थी वाक्य ओळखून लिहा.**

१.विलक्षण वेगवानता आजच्या जीवनात आढळते का ?

२. किती विलक्षण वेगवानता आढळते आजच्या जीवनात !

३. आजच्या जीवनात विलक्षण वेगवानता आढळते खूप !

४. विलक्षण वेगवानता आजच्या जीवनात आढळत नाही.

४.निसर्गरम्य स्थान किंवा मंदिर पाहण्यासाठी ही माणसे का जात नाहीत ?

- **वरील वाक्याचे विधानार्थी वाक्य ओळखून लिहा.**

१. माणसांनी निसर्गरम्य स्थान किंवा मंदिर पाहण्यासाठी जायला हरकत नाही.

२. निसर्गरम्य स्थान किंवा मंदिर पाहण्यासाठी किती माणसे जातात ?

३. किती माणसे निसर्गरम्य स्थान किंवा मंदिर पाहायला जातात !

४. निसर्ग रम्य स्थान किंवा मंदिर पाहण्यासाठी माणसे जायला नकोत.

५. माणसं स्वतःचा छंद कसा विसरू शकतात ?

- **वरील वाक्याचे योग्य विधानार्थी वाक्य ओळखून लिहा.**

१. माणसं स्वतःचा छंद नेहमी विसरतात.

२.माणसं स्वतःचा छंद विसरून जातात.

३. माणसं स्वतःचा छंद विसरू शकत नाहीत.

४. माणसं स्वतःचा छंद किती लक्षात ठेवतात.

**५: ब. सूचने प्रमाणे सोडवा.**

१.परशा ने प्रश्न नम्रपणे विचारला नव्हता.(होकारार्थी करा. )

२. आनंदा त राहण्याची सवयच जडायला हवी. ( नकारार्थी करा.)

३. पुढील सगळे मार्ग बंद च होते. (नकारार्थी करा.

४. त्याची सर इतर कुणाला येणार ? ( विधानार्थी करा.)

५. तुझ्या अंगात लई हाडं हैत. ( उद्‌गारार्थी करा. )

- ❖ समासकृती
  - ➢ योग्य पर्याय निवडा.

१. 'दरडोई' या सामासिक शब्दातील समास ओळखून लिहा.

अ. तत्पुरुष समास

ब. अव्ययीभाव समास

क. द्वंद्व समास

ड. बहुव्रीही

२. 'जीवनचक्र' या सामासिक शब्दातील समास ओळखून लिहा.

अ. विभक्ती तत्पुरुष समास

ब. द्विगू समास

क. द्वंद्व समास

ड. अव्ययीभाव समास

३. 'पंचमहाभूते' या सामासिक शब्दातील समास ओळखून लिहा.

अ. अव्ययीभाव समास

ब. द्विगू समास

क. द्वंद्व समास

ड. बहुव्रीही समास

४. 'स्त्रीपुरुष' या सामासिक शब्दातील समास ओळखून लिहा.

अ. बहुव्रीही समास

ब. अव्ययीभाव समास

क. तत्पुरुष समास

ड.द्वंद्व समास

५.'लक्ष्मीकांत 'या सामासिक शब्दातील समास ओळखून लिहा.

अ.बहुव्रीही समास

ब.अव्ययीभाव समास

क.तत्पुरुष समास

ड : द्वंद्व समास

६. 'प्रतिवर्षी' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा.

७.'दंतवैद्य' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा.

८.'परमेश्वर 'या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा.

९.'सुखदुःख' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा.

१०.'शब्दकोश' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा.

- ❖ प्रयोग कृती
  - ➢ योग्य पर्याय निवडा.

१. समीर चित्र रंगवतो. या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.

अ . कर्तरी प्रयोग

ब . कर्मणी प्रयोग

क . भावे प्रयोग

२. लोकांना पेढे वाटणं वेगळं. या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.

अ.कर्तरी प्रयोग

ब .कर्मणी प्रयोग

क .भावे प्रयोग

३.समीर ने चित्र रंगविले. या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.

अ .कर्तरी प्रयोग

ब.कर्मणी प्रयोग

क.भावे प्रयोग

४. कष्टाची भाकर गोड लागते.. या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.

अ.कर्तरी प्रयोग

ब.कर्मणी प्रयोग

क.भावे प्रयोग

५. तुम्ही गाडीतच बसा.. या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.

अ.कर्तरी प्रयोग

ब.कर्मणी प्रयोग

क.भावे प्रयोग

६.भावे प्रयोग असलेले वाक्य शोधून लिहा.

अ. आज लवकर सांजावले.

ब. त्याने कपाटात पुस्तक ठेवले.

क. आम्ही अनेक किल्लेपाहिले.

७. कर्तरी प्रयोग असलेले वाक्य शोधून लिहा.

अ.तबेल्यातून व्रात्यघोडाअचानक पसार झाला.

ब.  मावळ्यांनी शत्रूस युद्धभूमीवर घेरले.

क. युवादिनी वक्त्याने प्रेरणादायी भाषण दिले.

८. कर्मणी प्रयोग असलेले वाक्य शोधून लिहा.

अ. मुले प्रदर्शनातील चित्रे पाहतात.

ब. आम्ही शेळ्यांना बांधले.

क. भारतीय संघाने विश्वचषक स्पर्धा जिंकली.

९.  कर्तरी प्रयोग असलेले वाक्य शोधून लिहा.

अ) सुरेश गाय बांधतो.

ब )सुरेश ने गाय बांधली.

क) सुरेशनेगायीलाबांधले.

१०. भावे प्रयोग असलेले वाक्य शोधून लिहा.

अ )सुरेश गाय बांधतो.

ब )सुरेश ने गाय बांधली.

क )सुरेश ने गायी ला बांधले.

- ❖ अलंकार कृती

योग्य पर्याय निवडा.

- ➢ पुढील  काव्यपंक्तींतील अलंकार ओळखून लिहा.

१. मुंगी उडाली आकाशी

तिने गिळिले सूर्यासी !

अ) अर्थान्तरन्यास

ब ) अनन्वय

क ) अतिशयोक्ती

ड ) अपन्हुती

२. जो अंबरीउफळताखुरलगलाहे |

तो चंद्रमानिजतनूवरिडागलाहे !

अ ) अर्थान्तरन्यास

ब )अनन्वय

क )अतिशयोक्ती

ड )अपन्हुती

३.आहे ताजमहाल एक जगातीतोतोचत्याच्यापरी

अ) र्थान्तरन्यास

ब )अनन्वय

क )अतिशयोक्ती

ड )अपन्हुती

४. नहेनयन, पाकळ्या उमलल्या सरोजांतील।

न हे वदन, चंद्रमा शरदिचा गमेकेवळ॥

अ )अर्थान्तरन्यास

ब )अनन्वय

क )अतिशयोक्ती

ड )अपन्हुती

५. अनंत मरणें अधी मरावीं,

स्वातंत्र्याची आस धरावी,

मारिल मरणचि मरणाभावी ,

मग चिरंजीव पण ये बघतें.

अ )अर्थान्तरन्यास

ब )अनन्वय

क )अतिशयोक्ती

ड )अपन्हुती

६. हा आंबा साखरेसारखा गोडआहे.

अ ) आबा.

ब )साखर

क ) गोड

- **योग्य पर्याय निवडून लिहा.**

१. या अलंकारात उपमेयाला उपमेयाचीच उपमा घ्यावी लागते.

अ ) अपन्हुती

ब )अनन्वय

क )अतिशयोक्ती

२. या अलंकारात उपमेयाचा निषेध करून उपमेय हे उपमानच आहे असे सांगितलेले असते.

अ ) अनन्वय

ब )अतिशयोक्ती

क )अपन्हुती

- **पुढील उदाहरणातील उपमान ओळखून लिहा.**

१.न हे नयन पाकळ्या उमलल्या सरोजांतील

अ )न

ब ) कमळ पाकळ्या

क )उमलणे

२. परशा सिंहासारखा उग्र व बलदंड होता.

अ )परशा

ब )सिंह

क )बलदंड

❖ वाक्प्रचारकृती

१ 'जमीन अस्मानचा फरक असणे.'या वाक्प्रचाराचा अर्थखालील पर्यायांतून ओळखून लिहा.

अ) खूप तफावत असणे. ब) फरक नसणे.

क) जमीन पाहणे. ड) जमिनीवर असणे.

२..'जमीन अस्मानचा फरक असणे.'या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

३.'अंगावर काटा येणे . 'या वाक्प्रचाराचा अर्थखालील पर्यायांतून ओळखून लिहा.

अ) अंगाला काटे टोचणे ब) भीतीने अंगावर शहारा येणे

क) अंगात काटे घुसणे ड) अंगावर काटे पडणे

४. 'अंगावर काटा येणे'या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

५.'साखरझोपेत असणे'या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा.

अ) झोप न येणे ब) झोपेत साखर खाणे

क) पहाटेच्या गाढ स्वप्निल निद्रेत असणे ड) दुपारची झोप

६. 'साखरझोपेत असणे या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

७. 'खल करणे'यावाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा.

अ) हसणे ब) खड्डाकरणे

क) चर्चाकरणे ड) शरणयेणे

८.'खल करणे'या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

९. 'सिंहाचा बकरा होणे'या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा.

अ) ताकद येणे ब) आनंदी होणे

क) सिंह दिसणे ड) सर्व अवसान गळून पडणे

१०. 'सिंहाचा बकरा होणे'या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा

❖ **वाक्यप्रचाराचा योग्य अर्थ शोधून लिहा .**

| अ गट | ब गट |
|---|---|
| १)संसार साधणे | अ) नेहमी कष्ट करणे |
| २)मन दाबणे | आ)शरीर कष्टवणे |
| ३)पाणी शेंदणे | इ)प्रपंच सावरणे |
| ४)देह तोडणे – | ई)मनापासून कष्ट करणे . |
| ५)मातीत नांदणे | उ)राहाटाद्वारे पाणी उपसणे . |
| ६)रोज मरणे | ऊ)मातीत शेतीचे काम आनंदाने करणे. |

# विभाग ५- लेखन

आ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २०० ते २५० शब्दात निबंध लिहा .

१) कोरोना  संकटाचे  मानवी जीवनावरील परिणाम

२) पोलिसाचे  मनोगत

३) जलव्यवस्थापन § भविष्यकालीन नियोजन

४) भूक नसती तर ....?

५)  चला मन घडवू या

६) आव्हान प्रदूषण रोखण्याचे

७) वाचाल तरच वाचाल!

८) ग्रामीण सहजीवन

९) महापुराचे थैमान

१०) शाळेचे मनोगत

११) online शिक्षण काळाची गरज

कृती ५ आ)खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २००ते २५० शब्दांत निबंध लिहा.

१)माझे पहिले भाषण

२)मी अनुभवलेला पहिला पाऊस

३)आमचे कनिष्ठ महाविद्यालय

४)वर्षा ऋतूतील आमची सहल

५)माझे आवडते शिक्षक

६)माझी आई

७)माझ्या आठवणीतील बाबा

८)माझा आवडता लेखक

९)माझा वर्गमित्र

१०)शेतकऱ्याचे मनोगत

११)कोरोनाग्रस्ताची कैफियत

१२)मी वसुंधरा बोलतेय

१३)पुस्तकाचे मनोगत

१४)मोबाईलचे मनोगत

१५)महाविद्यालयीन तरुणाचे मनोगत

१६)परीक्षा रद्द झाल्या तर......

१७)कलावंत नसते तर......

१८)शब्दच नसते तर.....

१९)स्वप्न नसती तर....

२०)ऑनलाईन शिक्षण योग्य की अयोग्य?

२१)भ्रमणध्वनी शाप की वरदान

२२)वाचते होऊया

२३)मराठी आमुची मायबोली

२४)आजच्या तरूणांपुढील आव्हाने

स्त्री-पुरुष समानता काळाची गरज

२५)कोरोनाने जगाला काय शिकवले?